# दत्तकपण #३
जेफरसनविले, इंडियाना, अमेरिका
६०-०५२२सकाळ

1 ...भाऊ नेविल. वर्गाला, शुभ सकाळ. प्रभू येशूच्या त्या सर्व पुरेशा नावात परत एकदा येऊन तुम्हाला परत अभिवादन करण्यासाठी आम्ही खूप आनंदित आहोत, भरवसा करतो की तुमचा आठवडा त्याच्या स्तुतीत आणि आशिर्वादात फार महान होता.

अगदी या सकाळी येताना मी एका लहान मुलाला तेथे भेटलो, आणि त्याने मला राखणारे दूत दोन लहान मुलांवर पहारा करीत आहेत, याची लहानशी पट्टी दिली. आणि मला ठाऊक नव्हते की तो डाल्टन होता ... लहान डाल्टन मुलगा.

2 आणि येथे काही आठवड्या अगोदर, किंवा काही ... सुमारे दोन आठवड्यांअगोदर, तेथे पिता होता, ख्रिस्ती वडील, जो त्याच्या किशोरवयीन मुलीकरिता मागत होता जी अजूनही ख्रिस्ती नव्हती. किंवा, तो प्रार्थना रांगेत उभा होता, आणि पवित्र आत्मा म्हणाला, "मी तुला तुझे मूल देतो." आणि ती या सकाळी येथे आहे, वाचलेली आणि प्रभू येशूच्या नावात बाप्तिस्मा घेतलेली, व्यासपीठावर बसलेली आहे, अगदी जसे पवित्र आत्मा म्हणाला. आणि दुसरी सर्व मुले सभोवती बसलेली आहेत. मला ठाऊक आहे डाल्टन कुटुंब आनंदी आहे.

3 पहा गेल्या रविवारी ती लहान महिला जिच्यासाठी त्यांनी प्रार्थना केली होती त्या बाळासाठी, विचार करीत होते ते मरणार आहे. मी पाहतो ते अजूनही आपल्याबरोबर या सकाळी आहे, आणि त्याबद्दल आम्ही फार आनंदी आहोत, बहीण. त्यांनी विचार केला ती स्नायूंची विकृती होती, आणि त्याला ते नव्हते. तेव्हा आम्ही फार आभारी आहोत.

4 आमच्या सर्व चांगल्या मित्रांना पाहतो. मी लक्षात करतो हा मनुष्य येथे माझी विशेष मुलाखत घेण्यासाठी एका वेळेस चटाकाला आला होता, मी विश्वास करतो ते होते. मी तुझ्याबरोबर, आणि तुझ्या पत्नी व मुलांबरोबर न्याहरी केली होती, मी विश्वास करतो, किंवा तू व तुझी पत्नी, किंवा मुले, देखील, होय. मिडल टाऊन, जेथे आपण सर्व.... मी ते नाव विसरलो, तेव्हा मी फक्त चटाका म्हटले. होय, महाशय.

माझे कित्येक चांगले मित्र.... भाऊ चार्ली कॉक्स आणि बहीण नेली येथे, जे माझे दुसरे घर आहे, आणि काही नाही परंतु ... ती माझी स्वतःची मुले असली असती. मी खाली जातो तेथे ... ते जेथे मी माझ्या विश्रामाचा बराचसा वेळ व्यतीत करतो, तेथे खाली आहे. तो कंटकीमध्ये उत्तम खारीचा शिकारी आहे जेव्हा मी इंडियानामध्ये असतो. आणि जेव्हा इंडियाना.... आणि चार्ली, मी तुला सांगतो, मी अगदी उत्कंठित आहे, असे भरपूर वाटते की तेथे मी सुरु करण्यापूर्वी मी त्यातील काही सूर्यमासे किंवा दगडी मासे पकडावे. मला खरोखर वाटते की मी मोठ्या प्रमाणात पकडू शकतो.

5 भाऊ पर्नेल ... अर्नेट, दक्षिण कॅरोलिनामधील, आणि भाऊ.... बरे, अगदी कितीतरी वेगवेगळे येथे भिन्न स्थानांतून, जे या सकाळी आपल्या भेटीसाठी आलेले आहेत.

तुम्हाला माहिती आहे, येथे आमच्याकडे नियमित सदस्यता नाही. आमच्याकडे केवळ एकमेकांबरोबर संगती आहे, जेव्हा देवाचा पुत्र, येशू ख्रिस्त, याचे रक्त आपल्याला सर्व अनीतिमत्वापासून शुद्ध करते.

6 आता, आपल्याकडे अद्‌भुत अभ्यास आहे, अगदी गौरवी. आणि आपण ... किमान मला ठाऊक आहे मी त्याचा आनंद घेत आहे, आणि मला ठाऊक आहे तुम्ही देखील त्याचा आनंद घेत आहात. कधीतरी मी दिवसातून त्याबद्दल बोलावयास किंवा त्याबद्दल वाचावयास सुरुवात करतो, मी सुमारे दोन पदे घेतो, आणि मी शास्त्रलेखातून सुरुवात करतो आणि पहिली गोष्ट तुम्हाला माहित आहे, मी उत्पत्ती ते प्रकटीकरणापर्यंत जातो, आणि अजूनही जात आहे.

आणि, तुम्हाला ठाऊक आहे, मला वेळ घ्यावयास आवडेल जेथे आपण इब्रीच्या पुस्तकात जाऊ, आणि अगदी अशा प्रकारे घेऊ.... बरे, जेव्हा खारीचा ऋतू येतो, जसे सप्टेंबर... सुमारे ऑगस्ट, तुम्हाला ठाऊक आहे, आणि परदेशात जाण्याच्या समयापर्यंत चालतो, अगदी प्रत्येक रात्र इब्रीच्या पुस्तकात, किंवा निर्गमनाच्या पुस्तकात. कसे देवाने, निर्गमन, त्याचे लोक मिसरातून बाहेर आणीत होता, निर्गमन - आपले खूप सुंदर प्रतीक आता आपल्या निर्गमनासाठी तयार होत आहोत. ते ... ओह, ती इतकी सुंदर गोष्ट आहे. अखंड शास्त्रलेख अगदी एकत्र गुंफला जातो, आणि ती एक मोठी गोष्ट आहे.

7 आता, या सकाळी आपण अजूनही पुस्तकात आहोत.... आपण इफिसकरांस पुस्तक याचे पहिले तीन अध्याय घेणार होतो - पौलाचे इफिस येथील इफिसकरांस पत्र, प्रयत्न करीत आहेत ... योग्य दर्जात मंडळीला स्थानापन्न करीत आहे. आणि अगदी त्याकडे जाण्यापूर्वी, आपण एक किंवा दोन क्षण काढू शकतो प्रार्थनेसाठी, अगदी आपण करण्यापूर्वी.

8 हे परमेश्वरा, आमच्या देवा, आता आम्ही तुझ्या उपस्थितीत येत आहोत, जसे अयोग्य जसे आम्ही आहोत; तरीही आम्हाला ठाऊक आहे तेथे रक्ताचे बलिदान वाट पाहत आहे, आम्हाला सर्व अशुद्धतेपासून स्वच्छ करीत आहे, आणि आम्हाला पित्यासमोर सादर करीत आहे, निष्कलंक, निर्दोष असे. याचे श्रेय मिळण्यासाठी आम्ही कधी काही करु शकत नव्हतो, परंतु कारण की त्या येशूने आमच्यासाठी हे केले आहे, आम्ही त्याच्या उपस्थितीत आणि त्याच्या नावात नम्रतेने नतमस्तक होतो, मागतो की या सकाळी तू आमच्यामध्ये पवित्र आत्मा पाठविशील. आणि धर्मशास्त्रज्ञ म्हणून नाही किंवा शास्त्रलेख अनुक्रमाने मांडण्याचे ठाऊक आहे म्हणून नाही, परंतु फक्त उत्सुक आहे आणि कृतज्ञ आहे पवित्र आत्म्याच्या त्या जाणिवेमुळे जसा तो माझ्या अस्तित्वामधून हालचाल करीत आहे, त्याने आम्हा सर्वांना एकत्र आशीर्वादित करु दे जेव्हा आम्ही तुझे लिखित वचन वाचीत आहोत, की ते आम्हाला अनंत जीवन असे होवो. पित्या, हे मान्य कर. आम्ही ते येशूकरिता आणि येशूच्या नावात मागत आहोत. आमेन.

9 आता प्रथम, येथे मी सांगेन, की जर कोणत्याही समयी मी काही सांगेन जे कदाचित असहमतीचे असेल - अगदी बरोबर बसत नसेल, कदाचित तुमच्या शिकवणीला पूर्णता चुकीचे असेल, किंवा काहीतरी ज्याच्याबरोबर तुम्ही सहमत होऊ शकत नाही - मी पवित्र आत्म्याचा भरवसा करतो, की तो ते इतके मुरवेल आणि इतके मधुर बनवील की ते अजिबात कोणाचे मन दुखविणार नाही, पहा; की ते प्रेमाद्वारे आणि संगतीद्वारे होईल, की तेच काय ... ते त्याप्रकारे आहे.

आणि हे सर्व गेल्या रविवारच्या उपदेशाने सुरु झाले (मी विश्वास करतो ती गेल्या रविवारची सकाळ होती) "अस्वीकृत राजा" म्हणून. अजूनही कोणाकडे ध्वनिमुद्रणपट्टी आहे का? मी विचार करतो त्यांच्याकडे त्या आहेत, आणि जर तुमची इच्छा असेल तुम्ही त्या घेऊ शकता - "अस्वीकृत राजा."

10 आता फक्त काही दिवस आणि आम्ही मिड्लटाऊन, ओहियोमध्ये सुरु करणार आहोत. आम्हाला ते सर्व ज्यांनी त्यांची त्या वेळेसाठी सुट्टी तैनात केली आहे त्यांनी नक्की आम्हाला तेथे भेटावे असे आम्हाला हवे आहे, कारण आम्ही संगतीच्या मोठ्या समयाची मिड्लटाऊन, ओहियोमध्ये अपेक्षा करतो. डॉ सुलेवान हे अध्यक्ष आहेत, सभेचे, असा मी विचार करतो. आणि तेथे पाच रात्री असतील. मी तेथे पाहुणा वक्ता म्हणून प्रचार करणार आहे आंतर सांप्रदायिक मंडळीच्या आंतरराष्ट्रीय सभेत; आणि मग त्यानंतर आपल्या स्वतःच्या सभा असतील, त्यापुढे. आपण ते व्यासपीठ बारापर्यंत ठेवले आहे, परंतु सामंज्यस्यात आपण अगदी त्यानंतर दुसरा एक आठवडाभर घेऊ शकतो. अगदी पवित्र आत्मा कसे नेतृत्व करतो त्यावर अवलंबून आहे. आपणा सर्वांना पवित्र आत्म्याने नेतृत्व करावे असे वाटते. अगदी आत्मा जे काही करण्यास सांगेल, मग ते तात्काळ करा.

11 आणि लक्षात ठेवा आपण आत्म्याचे आज्ञापालन करीत असताना, एक महान धडा आपल्याला शिकणे आहे, तो म्हणजे कधीही घाई करु नका. पहा, तुमचा वेळ घ्या, विश्वास ठेवा. जर आपण देवाकडे काहीतरी मागितले असेल, लक्षात ठेवा, देव प्रार्थनेला उत्तर देतो. तो ते त्याच्या वेळेत करतो, जेव्हा ते उत्तम असते, ते आपल्यासाठी अगदी कल्याणकारक असते. आणि जर ते तसे नसेल, तर या सकाळी आपण येथे काय करीत आहोत? आपण ख्रिस्तीपणावर कशासाठी दावा करीत आहोत? जर हा देवाचा शब्द नसेल, मग तो सत्य नाही, मग आपण सर्वात दयनीय लोक असे असू.

मी इतका खुश आहे येथे असलेल्या कित्येकांशी हृदय जोडण्यास ज्यांना ठाऊक आहे की हा देवाचा अढळ शब्द आहे. मग हा प्रत्येक शब्द सत्य आहे, यातील प्रत्येक शब्द, यातील प्रत्येक टप्पा. आणि देवाच्या कृपेने, ती भूमी पाहण्याचे सौभाग्य मिळाले जेथे कधीतरी आपण सर्व प्रवास करणार आहोत.

12 काल... लोकांना ठाऊक नाही या प्रकारच्या सेवेबरोबर कसा नैराश्याचा समय येतो. मी खरोखर निराश झालो, आणि मी माझ्या पत्नीला म्हणालो, "मी इच्छा करतो मी फक्त पुढे जावे."

ती म्हणाली, "बिल, तू असे का म्हणतोस?"

मी म्हणालो, "ओह, येथे मला त्रास आणि गोष्टी आहेत."

आणि मग असे भासले की पवित्र आत्मा म्हणतो, "तू त्यांना टाळण्याचा प्रयत्न करतोस? तू त्यांना बगल देण्याचा प्रयत्न करतोस?" पहा?

"नाही," मी म्हणालो, "फक्त मला सरळ त्या सर्व गोष्टीच्या समोर उभे राहू दे आणि त्याला तोंड देऊ दे. पहा, फक्त...." पहा?

ते फार चांगले आहे. प्रामाणिकपणे, खरोखर, मी हे प्रत्यक्ष दर्शनाद्वारे सांगत आहे, की अगदी हे जीवन संपल्यानंतर, आपण त्या भूमीमध्ये प्रवेश करतो जी कोणीही विचार करण्या पलीकडील आहे. आणि जर येथे कोणी अनोळखी असेल, मी भरवसा करतो की तू नाही.... मी देवाला प्रार्थना करतो की तुम्ही मला धर्मवेडा समजू नये. मला हवे आहे, जर काहीही ... ते म्हणजे प्रामाणिक असावे आणि सत्य सांगावे. आणि ते माझे काय भले करील की मी जे काही चुकीचे आहे ते सांगावे जेव्हा तेथे इतके सत्य आहे? आपल्याला त्याबद्दल काहीतरी चुकीचे सांगण्याची काय गरज आहे? पहा? ते फक्त सत्य आहे.

13 आणि आश्चर्य नाही.... मी विश्वास करतो पौल तिसऱ्या स्वर्गापर्यंत उचलला गेला, आणि त्याने त्या गोष्टी पाहिल्या की ज्या बद्दल बोलणे त्याला फायद्याचे नव्हते. आणि एक दिवस तो म्हणाला, "डोळ्याने पाहिले नाही, कानाने ऐकले नाही, किंवा मनुष्याच्या मनात कधी आले नाही, असे देवाने जे त्याच्यावर प्रीति करतात त्याच्यासाठी सिद्ध केले आहे."

ओह, आपण येथे फक्त राहत आहोत ... आपण येथे खाली कचऱ्याच्या ढिगावर राहत आहोत, तेवढेच काय. ते फक्त घाणीचा ढिगारा घाणीच्या पूर्ण धुमसणाऱ्या धुराने भरलेला आहे. जरी अगदी आपण स्वतः त्याने दूषित झालेले नसू, आपण त्यामध्ये राहत आहोत, जेथे धूर पापाच्या धुमसणाऱ्या निखाऱ्यातून येत आहे. सर्वात मोठी उबग आणणाऱ्या गोष्टीचा मी विचार करु शकतो ती जुनी शहरातील कचरा जाळणारी जागा. तुम्ही कधी अशा एकाच्या जवळ गेलात का? ते भयंकर आहे, सर्व प्रकारच्या घाणीतून दूषित धुराची दुर्गंधी येत असते - आणि तुम्ही त्याचा श्वास घेता, आणि तो तुम्हाला अगदी सभोवती फिरवितो.

14 मी लक्षात करतो न्यू अलबनीला जाताना, खाली ... १८ व्या रस्त्याच्या खाली, जेथे जुना कचरा ढिगारा असत असे. आणि मला तेथे मीटर मोजावे लागे आणि जमा करावे लागे. आणि मी अगदी त्या दिवशी घाबरत असे जेव्हा - तो १८वा रस्ता येई - जेव्हा मला तेथे घेण्यासाठी खाली जावे लागे, कारण ते ... तो भयंकर दुर्गंधीचा वास घ्यावा लागे. तरीही, तेथे उंदराच्या आणि कुत्र्याची शरीरे पडलेली असत आणि सर्वकाही, तुम्हाला माहित आहे, ते धुमसत असे, आणि तो जुना धूर त्यातून बाहेर येत असे.

आता, तरीही याच्याशी जीवनाची तुलना होते, जेव्हा ते सर्वात उत्तम असते. अगदी धुमसणारे ... पापाची दुर्गंधी अगदी सर्वांकडून येत असते, जसे ते होते, आत्मिकरीत्या बोलत आहे. परंतु, ओह, जेथे हवा स्वतंत्रपणे वाहत असते, आणि सर्वकाही छान असते, आणि शांती आणि आनंद आणि अनंत जीवन, अगदी नदीपलीकडे! परंतु आपण युद्धात आहोत, तेव्हा फक्त झोपू नका आणि म्हणूया, "त्वरा करुया आणि तेथे पलीकडे जाऊया." ज्यांना आपण आणू शकतो त्या प्रत्येकाला आपल्याबरोबर आणूया. होय.

15 आणि आता या धड्याचा हेतू हा की त्यांना जे अगोदरच भूमीच्या पलीकडे आलेले आहेत, त्यांना आधार देणे. या अभ्यासाचा हेतू या इफिसकराच्या पुस्तकात मंडळीला योग्य दर्जात स्थानापन्न करणे जेथे ती पूर्णपणे ख्रिस्तामध्ये उभी आहे. ते जुन्या करारात यहोशवाच्या पुस्तकातील प्रतीक आहे, जेथे यहोशवाने प्रत्येकाला (गेल्या रविवारी आपण ते घेतले) वाटून दिली, यहोशवाने प्रत्येक माणसाला भूमी वाटून दिली; आणि ते त्याने प्रेरणेद्वारे केले.

कसे मोशेने लोकांना मिसरातून बाहेर आणले (लसूण, पातीकांदा) बाहेर; आणि त्यांना जागा दिली जेथे देवाने चारशे वर्षा नंतर ... किंवा, चारशे वर्षा अगोदर अभिवचन दिले होते, की तो त्यांना त्या जागी आणील, चांगली दुधा मधाची भूमी. आणि मोशेने इस्राएली मुलांचे सरळ त्या भूमीपर्यंत नेतृत्व केले, परंतु त्यांना पलीकडे नेले नाही.

आणि येशू, आत्मिकांना, लोकांना, की आपण ... आपल्याला पवित्र आत्म्याचे अभिवचन प्रारंभापासून दिलेले आहे, येशूने आपल्याला अभिवचनापर्यंत नेले. परंतु पवित्र आत्मा आला, जसा यहोशवा, पुढे नेण्यासाठी, आणि नेतृत्वासाठी आणि वाट दाखविण्यासाठी, आणि भूमी मिळविण्यासाठी, किंवा मंडळी मिळविण्यासाठी आला. आपल्याला, मग मूलभूतपणे, आढळते की, आपल्या....

16 आता येथेच जेथे, कदाचित, लोक विचार करतील मी उद्धट आहे आणि भावांची उपेक्षा करण्याचा प्रयत्न करीत आहे. मी नाही! देव माझा न्यायाधीश आहे, मी नाही, पहा. मी केवळ काहीतरी सूचित करण्याचा प्रयत्न करीत आहे जे सत्य आहे, पहा. पवित्र आत्म्याच्या नेतृत्वाऐवजी, आपण मनुष्यांतील नेते निवडले आहेत. आपल्याला मनुष्ये हवी आहेत जी आपल्याला आपला भाग वाटून देतील आणि आपले नेतृत्व करतील; संप्रदाय जसे मेथडिस्ट, बॅप्टिस्ट, प्रेसबायटेरियन, लूथरन, चर्च ऑफ ख्राईस्ट, पेन्टिकॉस्टल, आणि विभिन्न संप्रदाय, उदाहरण म्हणून संस्था स्थापित आहेत, आणि आपण त्याला अनुसरतो. परंतु आपण....

पवित्र शास्त्रात कुठेही आपण अशा प्रकारे करावे असे नाही. तेथे शास्त्रभागात एक मजकूर ही नाही देवाच्या सर्व पवित्रशास्त्रात जेथे कधी त्याने मंडळीची स्थापना केली, किंवा जेथे कधी तो संस्थेबद्दल बोलला. पवित्र शास्त्रात एक ही जागा नाही - परंतु नेहमी त्याच्या विपरीत होते. त्याला आपण जगाच्या गोष्टींप्रमाणे चालविले गेलेले असे नको आहेत. त्याला आपण असाधारण, बाजूला राखलेले असे हवे आहेत.

मला असे म्हणायचे नाही की मूर्ख असायचे, जसे आपण त्याला संबोधतो. मला म्हणायचे आहे बाहेर बोलाविलेले असे लोक, ओह, आशीर्वादित पवित्र राष्ट्र, निर्भत्सनेच्या वर जीवन जगणे, वर्तन करणे ... स्वतः वागणे अगदी जसे तो वागला असता, आपल्यामध्ये कार्यरत, कारण आपण त्याची हस्तकृती आहोत, ख्रिस्त येशूमध्ये चांगल्या कार्यासाठी निर्माण केलेले आहोत.

17 आता, बुधवार रात्र.... तुमच्यातील कित्येक बुधवार रात्री येथे नव्हते, परंतु आम्ही ... मी विश्वास करतो ते तिसरे पद आहे, किंवा.... नाही, ते पाचवे पद आहे: "...दत्तकपणासाठी...." किंवा लोकांना स्थानापन्न करण्यासाठी.

कसे की देव, त्याच्या लोकांना स्थानापन्न करण्याचा प्रयत्न करतो.... आणि जेव्हा देव एकाला स्थानापन्न करतो, मग सर्व अखंड मंडळीला त्या एकासारखे व्हायचे असते, त्याच प्रकारच्या गोष्टी हव्या असतात, त्याच गोष्टी करायच्या असतात. आपण वेगळ्या रीतीने कापले गेलेले आहोत. आपण भिन्न बनविले गेले आहोत, आपला स्वभाव भिन्न आहे, आणि आपण योग्य दर्जात वेगळ्या तऱ्हेने स्थानापन्न केलेले आहोत - प्रत्येकजण वेगळ्या कार्यासाठी. कदाचित एक फक्त छोट्याश्या कार्यासाठी; दुसरा मोठ्या कार्यासाठी. मी विश्वास करतो तो दावीद किंवा संदेष्ट्यांतील एक होता, आता मी विसरलो, म्हणाला, "दुष्टाईच्या तंबूत राहण्यापेक्षा, देवाच्या घरातील पायपुसणं होणे मला इष्ट वाटते."

18 आता आपण फक्त एका क्षणासाठी दत्तकपणावर थांबणार आहोत, पाचवे पद, यावर शक्य असेल तितके आपण खाली उतरण्याचा प्रयत्न करु. परंतु आता विषय लक्षात ठेवा, तो पूर्णतया स्थानापन्न करण्यावर आहे. किती जणांना ते कळले? एका शब्दात तुम्ही ते बोलताना ऐकू दे [मंडळी भाऊ ब्रॅन्हमबरोबर पुनरावृत्ती करते.]: येशू ख्रिस्ताचे शरीर ख्रिस्तामध्ये योग्य दर्जात स्थानापन्न करणे जेथे पवित्र आत्मा आपल्याला नेतृत्व करीत आहे. तेथे तुम्ही आहात, आता आपल्याला ते समजले, पहा. योग्य दर्जात आपल्याला स्थानापन्न करणे - इफिस पुस्तकाने ते करणे आहे.

19 आणि या गुरु शिक्षकाला, पौलाला, पहा. पहिली गोष्ट तो करतो ती म्हणजे पतन पावण्याच्या सर्व कल्पनांना तडाखा देतो, कधी "आज ख्रिस्ती आणि उद्या मी गेलेला असेन, आणि दुसऱ्या दिवशी देवाने मला दोषी ठरविले आणि दुसऱ्या दिवशी मी परत आलो," या सर्व कल्पनांना चितपट करतो. ते अर्थहीन आहे! आता हे ... हे पुस्तक सुवार्तिकतेच्या शिक्षणाला, सुवार्तिकाच्या उपदेशाला संबोधले गेले नाही. मी कार्यक्षेत्रावर याला स्पर्श करीत नाही. मी हे मंडळीत आणतो, कारण पौलाने ते संतांना उद्देशले आहे: जे ते पाचारण केलेले आहेत, आणि राखलेले, आणि भरलेले, आणि बाजूला ठेवलेले, आणि पवित्र आत्म्यामध्ये असलेले, अगोदरच कनानात आहेत. तो त्यांना सांगण्याचा प्रयत्न करीत आहे, पहिली गोष्ट, तुमच्या मनातून हे काढून टाका की तुम्ही नाश पावणार आहात आणि तुम्ही हे करणार आहात, आणि तुम्ही याला घाबरलेले आहात. कशाला ही घाबरु नका, कारण तो तुम्हाला सांगण्याचा प्रयत्न करीत आहे तुम्ही कोठे आहात, तुम्ही कोण आहात, तुम्ही कसे उभे आहात.

20 आता, तुम्ही कदाचित गोष्टी चुकीच्या कराल, आणि प्रत्येक वेळी तुम्ही काहीतरी चुकीचे कराल तुम्हाला त्याची भरपाई करावी लागेल. होय, महाशय, तुम्ही जे पेराल तुम्हाला कापणी करावी लागेल! परंतु तुमच्या तारणाशी त्या गोष्टीला काही कर्तव्य नाही. जेव्हा तुम्ही देवाच्या आत्म्याने

जन्म पावता, तुम्हाला अनंत जीवन मिळते आणि जसा देव मरु शकत नाही तुम्ही देखील मरु शकत नाही. तुम्ही देवाचा भाग आहात, तुम्ही देवाचे पुत्र आहात.

मी ब्रॅन्हम जन्मलेला होतो. तुम्ही मला कोणते दुसरे नाव देऊ शकता. कोणते दुसरे नाव मला काही कमी बनवीत नाही - मी अजूनही ब्रॅन्हम आहे. मी ब्रॅन्हम जन्मलो होतो, नेहमी ब्रॅन्हम असणार. मी कदाचित कधीतरी इतका विद्रुप होईन, संधिवाताने पडलेला, किंवा तब्बेत ढासळलेला आणि इतका विद्रुप झालेला की मी प्राण्यासारखा दिसत असेन, परंतु तरीही मी ब्रॅन्हम असेन. का? ब्रॅन्हम रक्त आतमध्ये आहे.

21 तेच काय ते तुम्ही आहात. आणि जोपर्यंत देवाने तुम्हाला बनविले आहे.... आता लक्षात घ्या, मी त्यांच्याशी बोलत नाही जे ख्रिस्ताबाहेर आहेत; मी त्यांच्याशी बोलत आहे जे ख्रिस्तामध्ये आहेत. तुम्ही ख्रिस्तामध्ये कसे येता? एका आत्म्याद्वारे. मोठा आत्मा [S-p-i-r]... त्याचा अर्थ "एका पवित्र आत्म्याद्वारे आपणा सर्वांचा एका शरीरात बाप्तिस्मा झाला आहे." आपण कसे मध्ये येतो? पाण्याच्या बाप्तिस्म्याद्वारे? कसा मी तुमच्याशी असहमत आहे, तुम्ही बॅप्टिस्ट आणि तुम्ही चर्च ऑफ ख्राईस्ट. पाण्याच्या बाप्तिस्म्याद्वारे नाही, कोणत्याही प्रकारे नाही! १ करिंथ १२ म्हणते एका आत्म्याद्वारे (पवित्र आत्मा) आपण सर्व त्या शरीरात आणले गेले आहोत, आणि जेवढे ते शरीर सुरक्षित आहे तेवढे आपण सुरक्षित आहोत. देवाने त्याचे अभिवचन दिले आहे.

22 कसा काय देव त्याला परत न्यायात आणू शकतो, जेव्हा तो कलवरीवर गेलेला आहे? गुलगुथावर जाताना, त्याला मारले गेले, घायाळ केले गेले. तो बरा होऊ शकला नाही, तो अगदी महत्प्रयासाने एक शब्द ही बोलू शकला नाही. कारण काय? त्याच्यावर जगाची पापे होती. यासाठी नाही की तो पापी होता, परंतु तुमच्यासाठी आणि माझ्यासाठी त्याला पाप बनविले गेले. सर्व जगाची पापे आदामापासून ते त्याच्या आगमनापर्यंत सर्व त्याच्या खांद्यावर ठेवली गेली. आणि देव त्याच्या पुत्राला शिक्षा करीत नव्हता. तो पापाला शिक्षा करीत होता. पहा ते किती भयंकर होते? तो प्रायश्चित्त करीत होता. तो सुटकाऱ्याचा मार्ग बनवीत होता त्या सर्वांसाठी जे देवाला त्याच्या पूर्वज्ञानाद्वारे ठाऊक होती की येतील. आपण त्यामध्ये काही मिनिटात येणार आहोत.

23 आता मग जेव्हा तुम्ही.... एका आत्म्याद्वारे आपला त्या शरीरामध्ये बाप्तिस्मा झाला आहे - एका शरीरात, जो ख्रिस्त आहे - आणि सर्वकाळासाठी आपण सुरक्षित आहोत.

आता, तेथेच जेथे हे विचित्रपणे प्रहार करताना भासते, विशेषकरुन आर्मेनियन विश्वासूंसाठी, की त्यांना सर्वांना काहीतरी करायचे आहे स्वतःला श्रेय देण्यासाठी, किंवा काहीतरी गुणवंत. कसे काय ते एकाच वेळेस दोन गोष्टींनी होऊ शकते? ते एकतर कृपेद्वारे आहे किंवा कृत्यांद्वारे आहे, एक. ते एकाच गोष्टीने असू शकत नाही ... ते ... दोन वेगळ्या गोष्टींनी; ते एकानेच असावयास हवे.

24 मी फक्त देवाच्या कृपेशिवाय अजून काही पाहूच शकत नाही. ती माझी घडण आहे. मी नेहमी कृपेमध्ये विश्वास केला आहे. मी फक्त सर्व बाजूने कृपा आहे, बस एवढेच. ते नाही.... अगदी माझ्या जीवनात, जेव्हा मी मुलगा होतो, मी काहीही पाहू शकत नव्हतो, फक्त कृपा, कृपा. ते म्हणाले, "तू माझी पाठ खाजीव आणि मी तुझी खाजवीन." ती भयंकर अभिव्यक्ती आहे. परंतु मी पर्वा करीत नाही की तू माझी पाठ खाजवशील किंवा नाही, जर तुला खाजविण्याची गरज असेल, कसेही करुन मी ती खाजवीन. पहा? कृपा. होय, महाशय. कृपा प्रेमाद्वारे काम करते. जर तुला त्याची गरज आहे (पर्वा न करता जर तू माझ्यासाठी कधीही काहीही केलेले नाही, त्याच्याशी एकही गोष्टीचे कर्तव्य नाही), जर तुला ते हवे आहे, कसेहीकरुन मी ते करीन. कृपा, कारण तुला त्याची गरज आहे.

25 मला वाचण्याची गरज होती. तेथे मला वाचविण्यासाठी काहीही नव्हते. मी स्वतःसाठी काहीही करु शकत नव्हतो. जसे मी कशालाही वाचवू शकत नव्हतो तसे मी स्वतःला देखील वाचवू शकत नव्हतो. परंतु मला वाचण्याची गरज होती, कारण मी देवामध्ये विश्वास केला होता. आणि देवाने त्याच्या पुत्राला पाठविले, माझ्या जागी सहन करण्यासाठी, पापमय देहामध्ये निर्माण केलेले असे, आणि मी वाचला गेलो. केवळ कृपेमुळे मी वाचलो. एकही गोष्ट मी करु शकत नव्हतो, किंवा तुम्ही करु शकत नव्हता, स्वतःला वाचविण्यासाठी. आणि ते ज्यांचे त्याला पृथ्वीच्या पायारंभापूर्वी पूर्वज्ञान होते....

26 आपण त्यातून गेलेलो आहोत. गेल्या बुधवारी आपण देवाला त्याच्या एला, इलोहीममध्ये चित्रित केले, आणि दाखविले की तो स्वयंभू होता. परंतु त्याच्या आतमध्ये पितृत्व होते, त्याच्या आतमध्ये विभिन्न गुणवत्ता होत्या, जसा तारक, जसा आरोग्यदाता. ते सर्वकाही देवामध्ये होते, आणि देव स्वयंभू होता. परंतु असे असताना ही तो तारक होता, तो पिता होता.... त्याच्याकडे दूत नव्हता, त्याच्याकडे काहीही नव्हते. तेथे तो सोडून काहीही नव्हते. तो स्वयंभू होता. तेथे देव सोडून काहीही अस्तित्वात नव्हते.

परंतु असे असताना देखील तो देव होता, मग तेथे काहीतरी असायला हवे त्याची उपासना करण्यासाठी, कारण त्याला उपासनेची आवड होती. आणि त्याच्या स्वतःच्या अस्तित्वाने त्याची उपासना करण्यासाठी निर्मिती निर्माण केली. (आता, तात्पुरता, परत त्यावर प्रहार करुया. आता तात्पुरता - आपण अखंड गोष्टीतून परत जाणार नाही, परंतु तुम्हाला ते ध्वनिमुद्रणपट्टीवर मिळेल.) परंतु मग कारण की तो देव होता, त्याने दूत बनविले, आणि दूतांनी त्याची उपासना केली. दूत अजून ही त्याची उपासना करतात. का, दूत जे देवाच्या उपस्थितीत उभे असतात ज्यांना सहा पंख असतात ... सहा पंख. ते दोन आपल्या मुखावर ठेवतात, दोन त्यांच्या पायावर ठेवतात, आणि दोनांनी उडतात, त्याच्या उपस्थितीत, रात्रंदिवस ओरडतात, "पवित्र, पवित्र, पवित्र, परमेश्वर सर्वसमर्थ देव." तेच काय ते शास्त्रलेख म्हणतो. त्यांनी त्याची उपासना केली. आता ते त्याची उपासना करण्यासाठी काहीतरी निर्मिलेले होते.

27 मग त्याच्या आतमध्ये तारकाचा गुण होता. त्या निर्मितीत एक कसे काय, नाशात जाऊ शकत होते, जेव्हा तेथे पाप नव्हते किंवा पापाचा विचार नव्हता? ते जाऊ शकत नव्हते. तेव्हा तेथे काहीतरी बनवावयास हवे होते जे नाशात जाऊ शकत होते, जेणेकरुन तो तारक होऊ शकत

होता. त्याच्या आतमध्ये आरोग्यदाता होता. तुम्ही विश्वास करता तो तारक आहे? तुम्ही विश्वास करता तो आरोग्यदाता आहे? बरे, काय जर तेथे वाचविण्यासाठी किंवा बरे करण्यासाठी काहीही नसते? पहा, तेथे काहीतरी त्या प्रकारे बनविणे होते.

तेव्हा आता, त्याने कधीही त्या प्रकारे बनविले नाही, परंतु त्याने मनुष्याला मुक्त नैतिक माध्यम बनविले: "जर तू हे घेशील तू जगशील; जर तू ते घेशील तू मरशील." आणि प्रत्येक मनुष्य जो या जगात येतो त्याच्या समोर तीच गोष्ट ठेवली जाते. देवाला, त्याच्या पूर्वज्ञानाद्वारे, ठाऊक आहे की कोण येईल आणि कोण नाही. जर देव....

28 काल एका धर्मशास्त्रज्ञाद्वारे प्रश्न विचारला गेला, मला, जो सभेत उपस्थित राहत होता किंवा ध्वनिमुद्रणपट्टी ऐकत होता. म्हणाला, "एक प्रश्न." तो म्हणाला, "मग देव सर्वव्यापी आहे?" मग तो म्हणाला, "तो सर्वत्र असू शकतो?"

मी म्हणालो, "ज्याप्रकारे शब्द सर्वव्यापी म्हणतो तसा तो सर्वव्यापी नाही. तो अस्तित्व असून, मग ... सर्वव्यापी असू शकत नाही. जर तो सर्वव्यापी आहे, का तुम्ही पवित्र आत्म्यासाठी प्रार्थना करता? जर तो सर्वव्यापी आहे, तो प्रत्येक तडा, कोपरा, भेग, प्रत्येक पेशी, तंतू, जे काही सर्व तेथे आहे, ते भरतो." मी म्हणालो, "जर तो सर्वव्यापी आहे, शेवटी, त्याने मोशेसाठी का शोध केला? तो जर सर्वव्यापी आहे तर, 'आदामा, आदामा, तू कोठे आहेस?' असे ओरडत, तो एदेनच्या बागेत वर आणि खाली का धावत होता?"

तो सर्वव्यापी आहे कारण तो सर्वसाक्षी आहे. त्याला सर्वकाही ठाऊक आहे कारण तो अमर्याद आहे. अमर्याद असल्यामुळे ते त्याला सर्वव्यापी करते. सर्वव्यापी असल्याने, मग, अमर्याद आहे, मग.... तो स्वर्गात बसतो, तो स्थळात वसतो कारण तो अस्तित्व आहे.

29 अमर्याद असल्याने, मग त्याला सर्व गोष्टी ठाऊक आहेत: प्रत्येक समयी चिलट त्याचा डोळा फड्फडवितो ठाऊक आहे; प्रत्येक मधमाशी ठाऊक आहे, तिचे मध घेण्यासाठी कुठे पोळ्यात जाते; झाडावर बसणारी प्रत्येक चिमणी त्याला ठाऊक आहे; त्याला तुमच्या मनातील प्रत्येक विचार ठाऊक आहे, कारण तो अमर्याद आणि सर्वसाक्षी आहे. ते म्हणजे, तो ... तो केवळ अमर्याद नाही, तो सर्वसाक्षी आहे, त्याला सर्वकाही ठाऊक आहे. परंतु तो अस्तित्व आहे. देव हा अस्तित्व आहे, आणि ह्या अस्तित्वातून हे सर्व निघण्यास सुरुवात झाली.

30 आणि पाप, मी त्या रात्री म्हणालो, पाप हे निर्मिती नाही. तेथे सिद्धता सोडून काही निर्माण केले गेले नाही. देवाने सर्व गोष्टी चांगल्या निर्माण केल्या. पाप ही निर्मिती नाही. म्हणाले, "बरे, तीच तर पापाची खरी निर्मिती आहे." तुम्ही ते ऐकले आहे. परंतु ती चूक आहे. पाप ... तेथे केवळ एक निर्माता आहे, तो देव आहे. देव पाप निर्माण करु शकत नव्हता, कारण तो पवित्र आहे आणि ते बनविण्यासाठी त्याच्यामध्ये काही नाही. पाप ही विकृती आहे. निर्मिती नाही, परंतु ती विकृती आहे. व्यभिचार हा नीतिमान वर्तन विकृत केले गेलेले आहे. खोटे हे चुकीचे सांगितले गेलेले सत्य आहे. कोणतेही पाप, कोणतेही पाप हे विकृत केलेले नीतिमत्व आहे.

31 त्यामुळे आता, देव बसतो.... त्याने अगोदरच स्वतःला प्रकट केले आहे, तो देव आहे. त्याने अगोदरच स्वतःला तारक म्हणून प्रकट केले आहे. मनुष्य नाशात गेला होता आणि त्याने त्याला वाचविले. त्याने अगोदरच स्वतःला आरोग्यदाता म्हणून प्रकट केले आहे. काही फरक पडत नाही लोक काय म्हणतात तो नाही; तो, कसेहीकरुन, आहे, अगदी सारखाच. तो आरोग्यदाता आहे, तो तारक आहे, तो देव आहे, तो अनंत आहे. आणि त्याच्याकडे उद्देश आहे. आणि त्याचा उद्देश हा होता की प्रारंभी निर्मिती बनवायची जी त्याला प्रेम करील आणि त्याची उपासना करील.

आणि त्याने निर्मिती बनविली, आणि निर्मिती पतन पावली. आणि मग देवाने, त्याच्या अमर्यादपणाद्वारे, वेळेच्या प्रवाहातून खाली पाहिले आणि प्रत्येक मानवाला बघितले की जो वाचेल. प्रत्येक मानव. त्याला ते पूर्वज्ञानाद्वारे ठाऊक होते. त्यामुळे जर तो, पूर्वज्ञानाद्वारे, जाणू शकतो की कोण वाचेल आणि कोण वाचणार नाही, तो पूर्वनिर्धारित करु शकतो. तेव्हा हा शब्द इतका वाईट नाही शेवटी, तो आहे? तो पूर्वनिर्धारित करु शकतो, कारण त्याला ठाऊक होते कोण वाचेल आणि कोण वाचणार नाही. त्यामुळे, जे वाचणार आहेत त्यांना पकडण्यासाठी, त्याला त्यांच्या पापांसाठी प्रायश्चित्त करावे लागले. (ओह, जर आपण करु शकलो, आपल्याला यामध्ये यायचे आहे, अगदी काही पद खाली.) त्याने आपल्याला अनंत जीवनासाठी पूर्वनिर्धारित केले, माहित होते की ते जे सर्वकाही बाजूला ठेवतील.... आणि काही फरक पडत नाही जगाच्या मुलांना ते किती खराब दिसते, त्याचा त्यांच्यासाठी काहीही अर्थ नाही, कारण ती देवाची मुले होती.

32 आणि त्याने त्यांना पाचारण केले.

आणि त्याने येशूला पाठविले, की त्याच्या रक्ताने भरपाई करावी, रक्ताची भरपाई, प्रायश्चित करण्यासाठी, किंवा स्वीकृती, किंवा शुद्धता. शुद्धतेची प्रक्रिया सतत.... केवळ एक वेळेस एका संजीवनात नाही, परंतु जिवंत असेपर्यंत, मध्यस्थी करत राहणे, की ख्रिस्तीजन दिवस आणि रात्र शुद्ध राखला जावा. तेथे येशू ख्रिस्ताचे रक्त आहे जे वधस्तंभावर स्वीकृती करीत आहे, देवाच्या उपस्थितीत, जे सतत आपल्याला, रात्रंदिवस, सर्व पापांपासून, शुद्ध करते. आणि आपण सुरक्षितपणे आत खोचले जातो. कसे खोचले जातो? पवित्र आत्म्याद्वारे, प्रभू येशूच्या शरीरामध्ये, आणि सुरक्षित असतो. "तो जो माझी वचने ऐकतो आणि ज्याने मला पाठविले त्याच्यावर विश्वास ठेवतो, त्याला सर्वकाळचे जीवन आहे आणि तो कधीही न्यायात जाणार नाही, परंतु मरणातून जीवनात पार गेला आहे." अजून अधिक न्यायनिवाडा नाही! ख्रिस्तीजन कधीही न्यायात जात नाही. ख्रिस्त त्याच्यासाठी गेला. माझा वकील माझ्या जागेवर उभा राहिला. त्याने माझे प्रकरण लढले, की मी अज्ञानी होतो. त्याने पित्याला सांगितले की मी लायक नव्हतो, कारण मी अज्ञानी होतो. परंतु त्याने मला प्रेम केले आणि त्याने माझी जागा घेतली, आणि माझ्या प्रकरणासाठी याचना केली, आणि आज मी स्वतंत्र आहे! होय, महाशय. आणि आपल्या पापांसाठी तेथे अर्पण करण्यासाठी, त्याने त्याचे रक्त सांडले.

33 गेली बुधवारची रात्र लक्षात आहे, नाही ख्रिस्तीजन.... ख्रिस्तीजन पाप करतो, परंतु पापी पाप करु शकत नाही. पापी पाप करीत नाही,

कारण तो पापी आहे. तो प्रारंभापासूनच पापी आहे, आणि बस एवढेच. येथे, या पुस्तकाचा मागील भाग घ्या. तो काळा आहे. त्यातील किती काळे आहे? तो सर्व काळा आहे. त्यात अगदी सफेद ही नाही, ते काळे आहे. तुम्ही म्हणता, "येथे इतका आहे." नाही, तो नाही, अखंड गोष्टच काळी आहे. ती अगदी सर्व काळी आहे. त्याच प्रकारे पापी आहे. तो सुरुवातीपासूनच दोषी आहे. बरे, तुम्ही म्हणता, "काय जर तो व्यभिचार करतो त्याबद्दल काय? काय जर तो कोणत्या स्त्रीला भ्रष्ट करतो? काय जर तो जुगार खेळतो? काय जर तो कोणालातरी गोळी झाडतो?" ते आपले काम नाही. ते आपले काम नाही. त्याची काळजी घेण्यासाठी तेथे खाली कायदा आहे. आपण सुधारक नाहीत; आपण सुवार्तेचे प्रचारक आहोत. आपण त्याला त्याने जे काही केले त्याकरिता दोषी ठरवीत नाही. आपण त्याला व्यभिचार केल्याबद्दल दोषी ठरवीत नाही; आपण त्याला दोषी ठरवितो कारण तो पापी आहे! जर तो ख्रिस्ती असता, त्याने ते केले नसते. ते बरोबर आहे. जर तो बदलला, तो ते करणार नाही. परंतु कारण की तो पापी आहे, तेच काय ते त्याला तसे करावयास लावते.

34 तेथेच जेथे हे कायदे पंडितांच्या खालून टेकूला प्रहार करते. होय, महाशय. भावा, मला तुला सांगू दे, ते कार्याने नाही, परंतु कृपेने आपले तारण झाले आहे, आणि ते विश्वासाच्या द्वारे. होय, महाशय. आता, मी कायदे पंडित भावांना दोष लावीत नाही. ते माझे भाऊ आहेत, आणि ते तेथे अगदी तसेच असतील जसे उरलेले बाकीचे तेथे असतील, कारण देवाने त्याची मंडळी तेथे असण्यासाठी नियुक्त केली आहे. परंतु फक्त, गोष्ट ... तुम्ही लोकांना अशा प्रकारे भंगलेले ठेवता, त्यांना काय ते कळत नाही. "आज, बरे, कदाचित जर मी...." फक्त त्यांना कळू दे की जोपर्यंत त्यांना जगाची भूक आहे, ते सुरुवातीपासूनच तेथे नाहीत.

35 मी यासाठी माझ्या पत्नीशी प्रामाणिक राहत नाही की ती मला घटस्फोट देईल. मी माझ्या पत्नीशी यासाठी प्रामाणिक राहतो कारण मी तिला प्रेम करतो. ती कायदेशीर मनोभूमिका आहे जी आम्ही घेतली आहे, की आम्ही एकमेकांना प्रेम करतो. प्रथम, ती तेथे असण्याअगोदर, तेथे प्रेम असावयास हवे. मी तिला प्रेम करतो. जरी मी विश्वास करतो जर मी काहीतरी चुकीचे केले ती मला माफ करील, तरी कसेहीकरुन मी ते करणार नाही. मी तिला प्रेम करतो.

त्याच प्रकारे ते ख्रिस्ताबरोबर आहे. जर मी जगलो.... मी पन्नास वर्षाचा आहे. जर मी नव्वद किंवा शंभर वर्षाचा होईपर्यंत जगलो, दुसरी पन्नास वर्ष प्रचार करण्यासाठी असली, आणि मी एकदा ही प्रचार केला नाही - खाली गेलो आणि नदीवर बसलो - कसेहीकरुन मी वाचलेलो आहे. देवाने मला त्याच्या कृपेने वाचविलेले आहे, काहीही जे कधी मी करु शकतो, केले असेल, किंवा काहीही, यासाठी अपात्र आहे. मी प्रचार केला कारण मी त्याला प्रेम करतो आणि मी त्याच्या लोकांना प्रेम करतो. आणि तेच कारण आहे की मला ठाऊक आहे मी मरणातून जीवनात पार गेलेलो आहे, कारण की मी त्यांना प्रेम करतो, आणि मी त्यांच्यापाठी जातो. काही फरक पडत नाही ते कोणत्या परिस्थितीत आहेत, कसेहीकरुन मी त्यांच्यापाठी जातो. जा, कसेहीकरुन त्यांना घ्या, कसेहीकरुन त्यांना खेचा. जर सेवक असहमत असतील आणि इतर असहमत असतील, आणि संप्रदाय असहमत असतील, ते मला थांबवीत नाही. तेथे काहीतरी.... त्याने त्याला थांबविले नाही! तो सर्व अविश्वासामध्ये सरळ आला, आणि त्याने त्याला थांबविले नाही. तो कसेहीकरुन सरळ पुढे गेला. तेच काय ते आपण करतो - बाहेर जातो आणि त्यांना घेतो, त्यांना कसेहीकरुन पकडतो, काही फरक पडत नाही. तुमच्या सर्व ताकदीनिशी, पोहचा, पकडा, धरुन ठेवा. तुम्हाला ठाऊक नाही ते कोण आहेत. त्यांना वाचवा. ते प्रेमाखातर. यासाठी नाही की मला करावे लागते, परंतु कारण मी प्रेम करतो, कारण तुम्ही प्रेम करता.

36 म्हणता, "मी जाऊन त्या स्त्रीबरोबर ते ठीक करावयास हवे, परंतु, मी तुम्हाला आताच सांगतो.... मी अंदाज करतो कारण मी मंडळीत जातो मला ते जाऊन ठीक करणे आहे." नाही, तुम्ही एक आहात ज्याला प्रथम ठीक होणे आहे, पहा. जर देवाचे प्रेम तुमच्या हृदयात नाही.... काहीतरी दुसरे तुम्हाला ते कळविते की तुम्ही चुकीचे आहात, मग तुम्ही जाऊन देवाबरोबर ते ठीक करा. मग तुम्ही ते तुमच्या शेजाऱ्याबरोबर ठीक कराल.

येशूने तीच गोष्ट शिकविली. तो म्हणाला, "जर तुम्ही वेदीवर आलात, आणि लक्षात आले की तुमच्या शेजाऱ्या किंवा भावा विरुद्ध काही आहे, जा आणि त्याच्याबरोबर अगोदर ठीक कर."

37 आता युगांमध्ये जी येणार आहेत.... बुधवारी रात्री आपल्याकडे, प्रकटीकरणे होती. या सकाळी परत एकदा, देवाच्या पुत्राच्या प्रकटीकरणामध्ये, ते आपण पकडू, जेथे देव थांबलेला आहे. आणि मग अंत समयात जेव्हा आपण सर्व त्याच्या समोर उभे आहोत.... दूत हरवले नव्हते. जसा आपण आशीर्वादाचा आनंद घेतो तसे त्यांना ठाऊक नाही; ते कधीही नाश पावले नव्हते. परंतु मला ठाऊक आहे मी कोठून आलो, मला तो खडक ठाऊक आहे ज्यामधून मला खोदून काढले, एक पापी. तुम्हाला ठाऊक आहे तो खडक ज्यामधून तुम्हाला खोदून काढले. आता जेव्हा आपण सापडलो, मग आपण देवासमोर उभे राहू शकतो. ओह, काय तो दिवस असेल!

38 मग दत्तकपण, स्थानापन्न करणे. आता, देव हे कार्य करीत आहे [अस्पष्ट शब्द]. आणि आता जर मी हे तुम्हाला समजाऊ शकलो, मग आपण सरळ आता पाचव्या पदावर सुरुवात करु. मला ते वाचायचे आहे:

त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे, आपल्याला येशू ख्रिस्ताच्या द्वारे स्वतःचे दत्तक होण्याकरिता पूर्वनिर्धारित केले होते...

तो देवाचा आनंद होता की त्याचा संकल्प करणे - दत्तक घेणे, स्थानावर नेमणे. आता तो काय करीत आहे? त्याच्या मंडळीला स्थानापन्न करीत आहे. प्रथम, त्याने त्याच्या मंडळीला पाचारले - मेथडिस्ट, प्रेसबायटेरियन, लूथरन, बॅप्टिस्ट - त्यांना बोलावीत आहे. मग त्याने काय केले? पवित्र आत्मा पाठविला आणि त्यांना पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा दिला.

39 तुम्ही पेन्टिकॉस्टल लोकांनी हे तुमच्या हृदयातून काढून टाकावे असे मला वाटते. पेन्टिकॉस्ट हा संप्रदाय नाही; पेन्टिकॉस्ट हा अनुभव

आहे. तो पवित्र आत्मा आहे. ती संस्था नाही. तुम्ही पवित्र आत्म्याला संस्थागत करु शकत नाही. तो ते सहन करणार नाही. आता तुमच्याकडे संस्था आहे ज्याला तुम्ही तसे संबोधता, परंतु पवित्र आत्मा सरळ पुढे निघून जातो आणि तुम्ही जेथे आहात तेथे अगदी तुम्हाला बसू राहू देतो, आणि अगदी पुढे चालू राहते, पहा. पेन्टिकॉस्ट ही संस्था नाही; पेन्टिकॉस्ट हा अनुभव आहे.

40 आणि मग देवाने त्याच्या मुलांना पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याद्वारे नवीन जन्म दिला. जेव्हा त्यांनी स्वतःला, नाजरीन, पिलग्रिम होलीनेस, यातून शुद्ध केले; मग पेन्टिकॉस्टच्या अनुभवांमध्ये आले, किंवा पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्यामध्ये, दानांच्या पुनःस्थापनेत, ते अगदी सरळ त्याच्या जवळ आले. ते सरळ अन्यभाषा बोलत आणि अन्यभाषेचा अर्थ सांगत पुढे गेले, आणि आरोग्याचे वरदान आणि चमत्कार देण्यात आले, आणि चिन्हे आणि अद्भुते त्यांच्याबरोबर असू लागली. आता ती मुले आहेत. ती देवाची मुले आहेत. ते ख्रिस्तामध्ये योग्य स्थानावर आहेत. ती जन्माद्वारे मुले झालेली आहेत. आणि नवीन जन्म आणि परिवर्तन हा स्वतः पवित्र आत्मा आहे.

तुम्ही अगदी परिवर्तन झालेले देखील नाहीत जोपर्यंत तुम्हाला पवित्र आत्मा मिळालेला नाही. तेच काय ते शास्त्रलेख म्हणतो. येशूने पेत्राला सांगितले.... कोणालाही विचारा, तुमचा शास्त्रलेख वाचा. तो प्रभू येशूवर विश्वास करण्याद्वारे नीतिमान ठरला होता. अनुयायी झाला होता, प्रेषित. येशूने त्याला राज्याच्या किल्ल्या दिल्या होत्या. आणि योहान १७:१७ मध्ये त्याने त्यांना पवित्र केले होते, त्यांना सामर्थ्य दिले होते, त्यांना बाहेर पाठविले होते, भुते आणि सर्वकाही काढून टाकण्यासाठी, त्यांना पवित्र केले होते. "पित्या, तुझ्या सत्याद्वारे, त्यांना पवित्र कर. तुझे वचन सत्य आहे. त्यांच्याकरिता मी स्वतःला पवित्र करतो."

41 तोच एक मधुर शब्द आहे जो कधी मी ऐकला असेल: "पित्या, मी स्वतःला त्यांच्याकरिता पवित्र करितो." तुम्हाला ठाऊक आहे त्याला घर असण्याचा अधिकार होता? तो मानव होता. तुम्हाला माहित आहे त्याला पत्नी असण्याचा अधिकार होता? तो एक मनुष्य होता. या सर्व गोष्टी असण्याचा त्याला अधिकार होता, परंतु तो म्हणाला, "पित्या, त्यांच्याकरिता मी स्वतःला पवित्र करतो. मी स्वतःला पवित्र करतो."

42 मी काल एका लहान प्रचारकाशी बोललो. येथे राज रस्त्यावर त्याच्यासाठी मी काही रात्रींमध्ये प्रचार करणार आहे. आणि मी त्याला काही विशिष्ट गोष्टींबद्दल विचारले. तो म्हणाला, "होय, भाऊ ब्रॅन्हम, परंतु माझ्या लोकातील बरेचसे लोक त्यामध्ये विश्वास करीत नाही."

मी म्हणालो, "त्यातील जवळ जवळ सर्वच कायदे पंडित आहेत?"

"होय." भाऊ ते विश्वास करीत नाहीत. "परंतु," तो म्हणाला, "त्यांच्या खातर...." ओह, मला त्याच्या मानेला मिठी मारायची होती. "त्यांच्या खातर, पहा, मी स्वतःला पवित्र करतो त्यांच्याकरिता."

43 ओह, येशू बारा मनुष्यांना प्रशिक्षित करीत होता, की त्या बारा मनुष्यांद्वारे सुवार्ता जगाकडे नेली जावी. आणि तो म्हणाला, "त्यांच्याकरिता मी स्वतःला पवित्र करतो." तुम्ही तुमच्या शेजाऱ्याकरिता, कोणा दुसऱ्याकरिता स्वतःला करा. "तुमच्या स्वतंत्रतेचा वापर बुरख्यासाठी करु नका," पौल म्हणाला, "परंतु स्वतःला पवित्र करा." वास्तविक ख्रिस्तीजनाने जसे वर्तन करावयास हवे तसे स्वतः शेजारी वर्तन करा. तुमचा संवाद ... जर तुम्ही तुमच्या शत्रूला भेटता, त्याच्याकरिता स्वतःला पवित्र करा, माहिती नसताना की तुम्ही काय कराल.

44 आता, पुत्राला स्थानापन्न करणे. पहिली गोष्ट पुत्र आत आल्यानंतर, तो पुत्र बनतो, परंतु मग आपल्याला आढळते की त्याचे वर्तन असते जे त्याला दत्तकपणासाठी ठरविते - तो योग्य वर्तन करतो किंवा नाही.

आणि ते पेन्टिकॉस्टल आहेत.... आता अगदी मला तुम्हाला दाखवू द्या की पेन्टिकॉस्ट हा संप्रदाय नाही. येथे किती बॅप्टिस्ट आहेत, जे बॅप्टिस्ट होते, ज्यांना पवित्र आत्मा प्राप्त झाला आहे? तुमचे हात पाहू द्या. पहा? येथे किती मेथडिस्ट आहेत ज्यांना पवित्र आत्मा प्राप्त झाला आहे? तुमचे हात वर करा. किती नाजरीन येथे आहेत ज्यांना पवित्र आत्मा प्राप्त झाला आहे? तुमचे हात वर करा. प्रेसबायटेरियन, पवित्र आत्मा प्राप्त झाला आहे? पहा? लूथरन, इतर संप्रदाय जे अजिबात पेन्टिकॉस्टच्या मालकीचे नाहीत, अगदी काही संप्रदायाच्या मालकीचे आहेत, पवित्र आत्मा प्राप्त झाला आहे? तुमचे हात पाहू द्या. पहा? तेव्हा मग पेन्टिकॉस्ट हा संप्रदाय नाही; तो अनुभव आहे.

45 आता, देवाने तुम्हाला ख्रिस्ताच्या शरीरात घेतले. आता तो काय करतो? तुम्ही स्वतःला सिद्ध केल्यानंतर, तुमच्या चांगल्या वर्तनाद्वारे स्वतःला पवित्र केले, पवित्र आत्म्याच्या आज्ञापालनात, काही फरक पडत नाही जग काय म्हणते....

46 मी हे खूप जोरदारपणे घासणार आहे, पहा, कारण.... मला ते उद्धट होण्यासाठी म्हणायचे नाही. कृपया, खरोखर नको, पहा, खरोखर विचार करु नका की मी शूद्रवृत्तीचा आहे. मला तसे व्हायचे नाही. मला काय चिंताक्रांत करते की लोकांना घ्या आणि त्यांना हे देवाने पाठविलेले सत्य प्रचार करा, आणि ते सरळ मागे वळतील आणि अगदी त्याच गोष्टी करीत राहतील, आणि म्हणतात की त्यांच्याकडे पवित्र आत्मा आहे. ते अगदी तुम्हाला नाश करते, पहा. काय बाब आहे? ते अगदी सरळ त्याच गोष्टीकडे येतात, अगदी जशी इस्राएलाची मुले. त्यांना राजा हवा होता जेणेकरुन हा राजा त्यांच्यावर राज्य करील आणि त्यांना अमोऱ्यासारखे, आणि अमालेक्यासारखे, आणि पलिष्ट्यासारखे वर्तु देईल.

47 महिलांनो, तुम्हाला ठाऊक आहे, की तंग विजार घालणे हे चुकीचे आहे? तुम्हाला हे माहित आहे? तुम्हाला ठाऊक आहे तुमच्या केसांच्या बटा कापणे चुकीचे आहे? तुला माहित आहे, पुरुषा, तू सिगारेट फुंकणे चुकीचे आहे, आणि ज्या प्रकारे तू वर्तन करतोस? तुला ठाऊक आहे तुझ्या घराचा पती न होणे हे चुकीचे आहे? तुझ्या पत्नीचा रागाचा पारा थोडा चढतो आणि तुला घराबाहेर काढते, आणि तू म्हणतोस, "होय, तुझे हृदय आशीर्वादित होवो, प्रिये, मी परत येईन"? तुला ठाऊक आहे तू.... जेव्हा तू स्वतःच्या घरावर ताबा घेऊ शकत नाही तर तू कसा काय देवाच्या घराचा प्रतिपाळ करशील? ते अगदी बरोबर आहे. बहिणी, तुला ठाऊक आहे, की तुझा पती केवळ तुझा पती नाही, परंतु तो तुझा अधिकारी आहे? देव तसे म्हणाला, कारण की पती फसला गेला नाही. स्त्री फसली गेली. आणि तुम्ही प्रचारक स्त्रियांना पाळक आणि प्रचारक

बनविण्याचे सुरु ठेवता तुमच्या मंडळ्यांमध्ये, असे माहिती असताना की देवाचे वचन त्याला दोषी ठरविते.

48 तुम्ही निरंतरपणे पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा हे नाव बाप्तिस्म्यामध्ये वापरता, जेव्हा पवित्र शास्त्रामध्ये त्यासाठी एक कण ही शास्त्रलेख नाही. मला हवे आहे की आर्चबिशप किंवा कोणीतरी मला दाखववावे कुठे पवित्र शास्त्रात कधी पिता, पुत्र, पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा झालेला आहे. मला हवे आहे कोणीतरी मला दाखववावे येशूचे नाव सोडून इतर कोणत्याही प्रकारे कधी कोणाचा बाप्तिस्मा झाला आहे. योहानाने बाप्तिस्मा केला नाही ... तो येतो हा विश्वास करीत त्यांचा बाप्तिस्मा झाला, परंतु त्यांना ठाऊक नव्हते तो कोण होता. परंतु त्यांनी ते ओळखताच, त्यांना परत येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घ्यावा लागला. मला कोणीतरी हवे.... मी असेम्ब्ली ऑफ गॉडच्या लोकांना विचारले, इतर प्रचारकांना, बॅप्टिस्ट, प्रेसबायटेरियन, आणि सर्वांना. ओह, ते त्याबद्दल बोलत नाही. मला शास्त्रलेख पाहायचा आहे.

आणि मग मी धर्मवेडा आहे, हू? मग मी वेडा आहे, माझे डोके फिरले आहे, मी एक वेडा माणूस आहे, फक्त कारण की मी तुम्हाला सत्य सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. आता, ते प्रामाणिकपणाचे आहे, भावांनो. जर मनुष्य देवासाठी विकला गेला असेल, तुम्ही तन, मन, आणि धन विकले आहे. तुम्ही बाजूला ठेवले गेले आहात. तुम्ही भिन्न निर्मिती आहात.

49 बोलाविलेले पुष्कळ आहेत; निवडलेले थोडे आहेत. फक्त ... कित्येक लोकांना पाचारण केले आहे. तुम्हाला तुमच्या हृदयात पाचारण मिळते, "होय, मी विश्वास करतो देव मला प्रेम करतो. मी विश्वास करतो तो ते करतो."

परंतु, भावा, तू त्या इतरांप्रमाणे पतनात जाणार आहेस, कारण ते त्या दिवशी तेथे येतील, अगदी म्हणत, "प्रभू, तुझ्या नावात मी भुते काढली. मी सर्वकाही तुझ्या नावात केले. मी आरोग्यसभा घेतल्या. मी सुवार्ता प्रचार केला. मी भुते घालविली."

आणि येशू म्हणेल, "येथून निघून जा. मला तुमची अगदी ओळख नाही, ढोंग्यांनो. तो तो आहे जो माझ्या पित्याच्या इच्छे प्रमाणे करतो." लोक ते का पाहू शकत नाहीत? आता, मला ठाऊक आहेत ते घासते. आणि मला दुखवायचे नाही. मला त्या प्रकारे करायचा हेतू नाही, परंतु, भावा, मी....

50 मला असे दिसत आहे की आपण अंत समयात आहोत, आणि देव दत्तक घेत आहे, ख्रिस्ताच्या शरीरात, मंडळीमध्ये योग्य पदावर बसवीत आहे, त्याचे.... आता, तेथे खूप नसतील ज्यांना तो तेथे बसविल. मी ते तुम्हाला सुरुवातीपासूनच सांगत आहे. बरे, तुम्ही म्हणता, "ओह, बरे, तेथे अगदी मोठ्या प्रमाणावर असणार आहे." परंतु त्याच्याकडे देखील, त्यातून, त्यांना खेचून काढण्यासाठी, सहा हजार वर्षे होती. लक्षात ठेवा, पुनरुत्थान येताच, आणि आपण त्यांच्याबरोबर घेतले जाऊ. फक्त त्यांच्यातील थोडेसे, पहा. तुम्ही तुमचे तारण लगेचच साधून घ्या. तुमच्याकडे पहा आणि बघा काय चुकीचे चाललेले आहे. पहा फक्त काय बाब आहे. मला ठाऊक आहे ते कठीण आहे, परंतु, भावा, हे सत्य आहे. हे देवाचे सत्य आहे.

दत्तकपण!

51 आपण देवासाठी इतके उत्कंठित असावयास हवे, आपण रात्रंदिवस जायला हवे. कोणत्याही गोष्टीने आपल्याला थांबवता कामा नये. आणि आपण आपल्या जीवनामध्ये, इतके मधुर आणि अल्हादायक, आणि इतके दयाळू आणि इतके ख्रिस्तासारखे असावयास हवे. ते प्रत्येक दिवसाचे जीवन असावयास हवे. येशू म्हणाला, "रानातल्या फुलाकडे पहा, ते कसे वाढते (कष्ट करते आणि कताई करते); तरीही मी तुम्हाला सांगतो की शलमोन देखील त्याच्या सर्व गौरवात त्याच्यासारखा सजला नव्हता." शलमोनाकडे पोशाख होता जो गौरवी ताग आणि कलाकुसर आणि सर्व गोष्टींनी सजविलेला होता, परंतु ते नव्हते ज्याबद्दल तो बोलत होता. भुईकमळाला वाढण्यासाठी, त्याला रात्रंदिवस कष्ट करावे लागतात. या रेषेच्या शेवटापर्यंत तुम्हाला कशासाठी यायचे आहे? जर नीतिमान मोठ्या कष्टाने वाचतो, तर पापी (तो जो अविश्वासू आहे) आणि अधर्मी (तो मनुष्य जो वचन ऐकतो आणि त्यामध्ये चालण्याचे नाकारतो) कुठे असतील...? आता आपण काय करावयास जाणार आहोत?

52 हे, आता, ही आपली मंडळी आहे. आपल्यामध्ये कदाचित चार किंवा पाच अनोळखी असतील. परंतु ही मंडळी आहे. मी तुम्हाला शिकवीत आहे. हे ध्वनिमुद्रणपट्ट्यांवर जात आहे. जे लोक या ध्वनिमुद्रण पट्ट्या ऐकतील त्यांनी लक्षात ठेवावे, की हे माझ्या मंडळीला आहे असे मला वाटते. बाहेर पलीकडे तेथे लोकांमध्ये, मी पुरेसा सभ्य गृहस्थ राहण्याचा प्रयत्न करतो त्यांना सांगण्यासाठी, एक प्रकारे तेथे, त्यांच्या लहानशा विना सायीच्या दुधाच्या कल्पनांबरोबर बाळासारखे राहण्यासाठी. परंतु जेव्हा खरोखर सत्य ठेवण्याची वेळ येते, ते ठेवूया.

53 दत्तकपण, योग्य पदावर स्थानापन्न करणे! ते कुठे आहेत? मला दाखवा ते कुठे आहेत? देव प्रकटीकरणाद्वारे त्याच्या मुलांना बाजूला पाचारण करीत आहे. त्यांना त्याबद्दल एकही शब्द बोलण्याची गरज नाही, तुम्ही काहीतरी घडताना पाहता. त्याच्या पुत्राला योग्य पदावर स्थानापन्न करताना, त्याला त्याच गोष्टींबरोबर अगदी तंतोतंत नियमात आणताना.... त्याला तितकाच अधिकार आहे, त्याचे शब्द अगदी आद्यदिव्यदूतासारखे चांगले आहेत - अधिक चांगले. ह्या पुत्राला दत्तक घेतले आहे, उच्च जागेवर ठेवले आहे, तेथे बाहेर बसविले आहे, त्याची वस्त्रे बदलली आहे, त्याचा रंग बदललेला आहे. पित्याने समारंभ केला, म्हणाला, "हा माझा पुत्र आहे. यापुढे तो राज्यपाल आहे. तो अधिकारी आहे. तो माझ्या सर्व वतनावर आहे. जे काही माझे आहे ते त्याच्या मालकीचे आहे." ते बरोबर आहे.

54 मग आपण त्याच एला, एला, इलोहीमकडे परत जाऊ शकतो, पहा, जेथे तो स्वयंभू आहे. मग यहोवाकडून परत येतो ज्याने काहीतरी बनविले. त्याने मानवाला पृथ्वीवर सत्ता दिली. आपण कशासाठी थांबलेले आहोत? प्रकटीकरणासाठी. पृथ्वी कण्हत आहे. त्याकडे येऊया आणि ते वाचूया. ठीक आहे.

त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे, आपल्याला येशू ख्रिस्ताच्या द्वारे ... स्वतःचे दत्तक होण्याकरिता ... पूर्वनिर्धारित केले,

त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून....

त्याची कृपा काय आहे? मागे, जेव्हा तो पिता नव्हता, त्या अगोदर, त्याची कृपा, त्याची प्रीति, स्वतःला मूल बनविले, की आपल्याला मुलांच्या दत्तकपणात, त्याच्या कृपेच्या गौरवासाठी पूर्वनिर्धारित करावे, पहा.

... ज्यामध्ये त्याने आपल्याला [व्यक्ती] प्रियकरामध्ये स्वीकारले [जो ख्रिस्त आहे].

कसे आपल्याला स्वीकारले? त्याच्याद्वारे. आपण त्याच्यामध्ये कसे येतो? एका आत्म्याद्वारे, सर्वाचा त्याच्यामध्ये बाप्तिस्मा झालेला आहे. ऐका.

ज्यामध्ये आपल्याला उद्धार आहे, त्याच्या रक्ताद्वारे आपल्याला उद्धार आहे, आपल्या पापांची[s-i-n-s] क्षमा आहे....

55 जोपर्यंत तेथे कुठेतरी पापाचे प्रायश्चित्त असल्याशिवाय, तुम्ही कसे काय देवाच्या नियुक्तीचे पूर्वनिर्धारितपण आणि स्थानपन्नता प्रचार करु शकता? का ते आहे? प्रत्येक दिवशी तुम्ही चूक करता, प्रत्येक दिवशी तुम्ही चुकीचे करता. परंतु जर तुम्ही नव्याने जन्मलेले आहात, स्त्री व पुरुष, जेव्हा तुम्ही चूक करता, देवाला ठाऊक आहे तुम्हाला त्याबद्दल दुःख वाटते. तुम्ही राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट किंवा कोणासमोरही उभे राहू शकता, आणि म्हणता, "मी चुकीचा आहे. देवा मला या गोष्टीबद्दल क्षमा कर." का? आणि तेथेच जेथे रक्ताचे प्रायश्चित्त....

तुम्ही त्या पापाचे[s-i-n-s] निरीक्षण केले. पापी हा पापीच आहे; तो पाप करीत नाही. परंतु मंडळी पाप करते - चुकीचे करते, चुकीचे विचार घेते, चुकीचे संस्कार, शंकास्पद करते, लहान बाळ जसे चालते तसे झोकांड्या खाते, कसे चालायचे ते शिकण्याचा प्रयत्न करते. त्याला अजूनही ठाऊक नाही अगदी चांगले कसे चालायचे कारण तो लहानसा मुलगा आहे. परंतु आपल्याकडे एक हात आहे जो खालपर्यंत पोहोचतो आणि आपल्याला घेतो आणि स्थिर करतो, आणि म्हणतो, "पुत्रा, हे पाऊल अशा प्रकारे टाक." तो आपल्याला घेऊन, मारीत नाही कारण आपण चूक करतो. तो आपल्याला मरेपर्यंत मारीत नाही कारण आपण चालण्याचा प्रयत्न करीत आहोत. तो आपल्याला प्रेम करतो जसे आपण आपल्या मुलांना प्रेम करतो.

56 एक वास्तविक, वास्तविक पिता त्याच्या मुलाला मारीत नाही जेव्हा तो चालण्याचा प्रयत्न करतो जर तो जमिनीवर खाली पडतो. तो मोठ्या बलवान बाहुने खाली येतो आणि त्याला उचलतो, दोन्ही हाताने त्याचा ताबा घेतो, म्हणतो, "या प्रकारे तुला ते करणे आहे, पुत्रा. अशा प्रकारे चाल."

त्याच प्रकारे देव त्याच्या मंडळीला करतो. खाली येतो आणि त्याला त्याच्या बाहूंमध्ये घेतो, त्याला वर उचलतो आणि म्हणतो, "अशा प्रकारे चाल, पुत्रा. येथे, अशा प्रकारे बोलू नको. अशा प्रकारे ते बोल. आणि मी पर्वा करीत नाही मंडळी काय म्हणते, हे काय म्हणते, ते काय म्हणते, तू अशा प्रकारे म्हण. अशा प्रकारे - ते असे आहे! जर माझे वचन ते प्रचार करते, तू सरळ त्याबरोबर रहा, त्याबरोबर चाल! सरळ त्याबरोबर रहा. काळजी करु नको काय सर्वजण बोलतात, अगदी सरळ त्याबरोबर रहा. अशा प्रकारे चाल. या मार्गाने तू तुझी पावले टाक."

57 आपले पाप - प्रायश्चित्त, प्रीति, आपल्या पापांसाठी, किंवा आपल्याला कधीच संधी नसती. कसे आपण अगदी त्या वचनामध्ये नांगरलेले आहोत.

... ही कृपा त्याने आपल्यावर;

त्या प्रियकराच्या ठायी विपुलतेने केली आहे....

विपुलता काय आहे? ओह, माझ्या! ती त्याने विपुलतेने - त्याची भली मोठी रास.

... सर्व ज्ञान व बुद्धी त्यांच्यासह त्याने ती कृपा आपल्यावर विपुलतेने केली आहे...

बुद्धी - सर्व ज्ञानासह त्याने ती कृपा आपल्यावर विपुलतेने केली आहे. सर्व ज्ञानासह. जगिक नाही. जगाचे ज्ञान त्याच्यासाठी मूर्खपणा आहे, आणि देवाचे ज्ञान जगासाठी मूर्खपण आहे. अगदी जसा दिवस आणि रात्र आहे, एक दुसऱ्याशी सहमत होऊ शकत नाही. परंतु जेव्हा सूर्य उगवण्यास सुरुवात होते आणि दिवसाचा समय येतो, रात्र जागे जागेतून विखरली जाते. आणि जेव्हा सुवार्तेचा प्रकाश आत येण्यास सुरुवात होते, जगाच्या सर्व गोष्टी धूसर होण्यास सुरुवात होते. आणि तो काय करतो? तो त्याच्या मुलांवर सूर्य प्रकाशाची विपुलता करतो, आत्म्यामध्ये चालतात, देवाच्या आत्म्याद्वारे चालविले जातात, त्याच्या कृपेमधे वाढतात, सर्व ज्ञान व बुद्धी, समज, आणि चतुरपणाने, हे समजण्यासाठी की कसे चालावे. तुम्ही पाहता ते चुकीचे आहे, मग काय करावे याबद्दल काळजीपूर्वक रहा, कसे तुम्ही.... जर ते चुकीचे आहे, त्याकडे कसे जावे याबद्दल देखील काळजीपूर्वक रहा. बुद्धीविवेक - अगदी खरोखर निकट असा, अगदी निश्चित की तुम्हाला ठाऊक असावे की त्याच्याकडे कसे जावे. "सापासारखे चतुर, कबुतरासारखे निरुपद्रवी." तेच काय ते येशू म्हणाला.

58 ओह, हे मणी आहेत, मित्रांनो! आपण अगदी यावर दिवसानंतर दिवस राहू शकतो. ते अद्भुत नाही का? विवेक, बुद्धी, त्याने आपल्याकरिता त्याची विपुलता केली आहे, ओतले आहे. आपल्याला चमचाभर दिले नाही, परंतु मोठे फावडे घेतले आहे आणि अगदी ते फेकत आहे अशा प्रकारे. आपल्यावर, बुद्धी विवेकपणाने त्याच्या कृपेने, विपुल केली आहे! ओह, विस्मयकारक कृपा, कसा मधुर नाद! आता:

सर्व विवेक ... व बुद्धी त्यांच्यासह त्याने ती कृपा आपल्यावर विपुलतेने केली आहे;

त्याने त्याच्या स्वसंकल्पाचे रहस्य....

तो कोणाशी बोलत आहे? संप्रदाय? कृपया, माझ्या भावांनो, असा विचार करु नका की मी तुमच्या संप्रदायांना कमी लेखतो. मी नाही. मी तुम्हाला सांगण्याचा प्रयत्न करीत आहे की ती आरंभापासून चुकीची गोष्ट आहे. येशू म्हणाला, "जा सुवार्ता प्रचार करा"; आपण गेलो आणि संप्रदाय बनविले. त्याच कारणामुळे आपल्याकडे तो नाही. आपण मनुष्याच्या बुद्धीनुसार मागे चालत आहोत.

जर कॅल्विन उठू शकला....

59 का, मी अलीकडेच एका महान माणसाच्या, महान सुधारकाच्या कबरेपाशी उभा होतो. आणि मी विचार केला काय महान व्यक्ती तो होता. तो होता. बरे, ते सर्व.... तो जॉन वेस्ली होता. आणि मी विचार केला, जर जॉन वेस्ली या कबरेतून उठू शकला आज आणि त्याच्या मंडळीची स्थिती पाहिली, त्याला त्याच्या नावाची लाज वाटेल. जॉन वेस्ली देवभीरु मनुष्य होता, क्रांतिकारक पटकन पकडणारा, जसे तो त्याला म्हणतो. जॉन वेस्ली हा पवित्र मनुष्य होता ज्याने देवामध्ये विश्वास केला, आणि पावला पावलाने त्याच्या मागे चालला. परंतु जॉन मेल्यानंतर, ते म्हणाले, "आपण जॉनसाठी मंडळी करु जेणेकरुन आपल्याकडे मंडळी असेल, आणि आपण त्याला मेथडिस्ट मंडळी म्हणूया कारण त्याच्या पवित्रीकरणाच्या पद्धतीनुसार ते कृपेचे दुसरे कार्य होते."

मग त्यांनी मंडळी बनविली, आणि आज ती मंडळीतील लोक सर्व गोष्टी नाकारतात ज्यासाठी जॉन वेस्ली उभा राहिला. जॉन वेस्लीने दैवी आरोग्याचा प्रचार केला. जॉन वेस्लीने आत्म्याच्या बाप्तिस्म्यावर विश्वास केला. जॉन वेस्लीने वरदानाच्या पुनःस्थापनेवर विश्वास केला. जॉन वेस्ली, मार्टिन लुथर, त्या महान मनुष्यांतील कित्येक अन्य भाषेत बोलले आणि अनुवाद केला. आणि आज, तुम्ही मेथडिस्ट मंडळीत किंवा लूथरन मंडळीत अन्य भाषेत बोललात, ते तुम्हाला दरवाज्यातून लाथ मारुन काढतील. काय बाब आहे? अगदी या समयाला जेव्हा आपण पुत्राच्या स्थानपन्नतेत यायला हवे, काय बाब आहे? त्यांनी अजून कशालातरी दत्तक घेतले आहे, कारण त्यांना देवाचे रहस्य ठाऊक नाही. आणि विद्यालयातून त्यांना ते कधीही समजणार नाही.

60 मला तुमच्यासाठी काहीतरी अगदी वाचू द्या. ते ठीक आहे का? ठीक आहे. वळू या ... येथे मी काहीतरी लिहून ठेवले आहे. शोधून काढूया कसे पौल.... आता, येथे या संदेशाचा शिक्षक आहे. प्रेषित कृत्ये ९:५ मध्ये जाऊया अगदी एक मिनिट. [ध्वनिमुद्रणपट्टीवर रिक्त स्थान.] मला सांगा जेव्हा मी बाहेर....

आणि शौल, अजूनही शिष्यांना धमक्या देणे व ... त्यांचा घात करणे ह्या विषयीचे फुत्कार टाकीत होता [ओह, तो लहानसा आकड्याच्या नाकाचा, तापट, शूद्रवृत्तीचा यहुदी], त्याने प्रमुख याजकाकडे जाऊन,

त्याच्या पासून दिमिष्कातल्या सभास्थानांना अशी पत्रे मागितली, की जर त्याला कोणी आढळले....

"मी त्यांना जाऊन पाहीन. जर मला ते अगदी आढळले, मुला, मी त्यांना काय करीन, पहा, जर फक्त मला ते आढळले!" परंतु तो पूर्वनिर्धारित होता.

61 कसे काय तुम्हाला माहित तो वृद्ध मद्यपी तेथे खाली पूर्वनिर्धारित नाही जीवनासाठी? कसे काय तुम्हाला माहित ती वृद्ध वेश्या जिच्याशी तुम्ही बोलणार देखील नाही, तुम्हाला कसे ठाऊक ते लहानसे हस्तांदोलन आणि तिला मंडळीत आमंत्रण देणे तिच्यातून देवासाठी संत बनविणार नाही तेथे पलीकडे गौरवामध्ये? तुम्हाला कसे ठाऊक ती नाही? तेच काय ते आपल्याला ठाऊक नाही. परंतु ते आपले कर्तव्य आहे. जसा कोळी जाळे समुद्रात टाकतो आणि बाहेर ओढतो ... ते मासे, बेडूक, पाली, पाणकोळी, आणि सर्वकाही आणतो; परंतु त्यातील काही मासे असतात. त्याला ठाऊक नसते, तो केवळ जाळे फेकतो. तेच काय ते आपण करतो. पौलाला पहा:

...दिमिष्कातल्या सभास्थानांना अशी पत्रे मागितली, की तो मार्ग अनुसरणारे, पुरुष किंवा स्त्रिया, कोणीही त्याला आढळल्यास, त्याने त्यांना बांधून, यरुशलेमेत आणावे. [भावा, तो खरोखर कठोर होता!]

मग जाता जाता असे झाले की, तो दिमिष्काजवळ येऊन पोहचला: त्या वेळी अकस्मात त्याच्या सभोवती आकाशातून प्रकाश चमकला....

"तेथे त्या मार्गावर, डॉ. एफ. एफ. जोन्स, याजक आला, आणि त्याला म्हणाला, 'आता तुला विद्यालयाच्या अनुभवाची गरज आहे, पुत्रा, आणि मी विश्वास करतो देव तुला वापरु शकतो.'" तो भयंकर दिसणारा शास्त्रलेख नसता का, अशा प्रकारे तो वाचणे? आता, ते अगदी तेवढेच अर्थ आहे.... मी ते विवादासाठी सांगत नाही. त्याचा अगदी तेवढाच अर्थ निघतो जेवढा आज आपल्याला त्यातून मिळतो. "तुम्हाला माहित आहे, तुझी आई चांगली स्त्री होती. मी विश्वास करतो तू चांगला प्रचारक होशील."

62 पहा काय घडले:

आणि जाता जाता असे झाले की, तो दिमिष्काजवळ येऊन पोहोचला: त्या वेळी अकस्मात त्याच्या सभोवती, आकाशातून, प्रकाश चमकला [हू, अलौकिकाची सुरुवात झाली]:

आणि तो जमिनीवर पडला, आणि त्याने अशी वाणी आपणाबरोबर बोलताना ऐकली की ... शौला, शौला, माझा छळ का करतोस?

आणि तो म्हणाला, प्रभू, तू कोण आहेस? त्याने म्हटले, ज्या येशूचा तू छळ करतोस तोच मी आहे: आणि पराणीवर लाथ मारणे

तुझ्यासाठी कठीण आहे.

आणि तो थरथरला आणि अचंबित झाला आणि म्हणाला, प्रभू, मी काय करावे ... अशी तुझी इच्छा आहे? आणि प्रभू त्याला म्हणाला, उठ, शहरात जा, तू काय करावे ते तुला सांगण्यात येईल.

63 आणि माणसे त्याच्याबरोबर प्रवास करीत होती, पुढे गेली, आणि त्यांना मनुष्य आढळला.... हनन्या, तेथे खाली, दृष्टांत पाहिला - सर्व अलौकिक. आणि जुना शौल, तो जुना शूद्र मनुष्य.... या हनन्याने दृष्टांत पाहिला.... त्याच्या घरामध्ये (तो संदेष्टा होता), त्याच्या घरामध्ये, प्रार्थना करीत होता, आणि त्याने दृष्टांत पाहिला. प्रभू त्याच्याशी बोलला आणि म्हणाला, "तेथे पलीकडून मनुष्य रस्त्यावरुन येत आहे. तो घुबडासारखा आंधळा आहे. आणि त्याचे नाव शौल आहे. तो तार्सकर शौल आहे."

तो म्हणाला, "प्रभू, मी मोठ्या गोष्टी ऐकल्या आहेत.... मला पाठवू नको, मी लहान मनुष्य आहे. त्याच्यामागे मला पाठवू नको."

तो म्हणाला, "परंतु, पहा, त्याच्या रस्त्यावर खाली मी त्याला दृष्टांत दाखविला आहे. मी त्याच्यासमोर अग्निस्तंभात अवतरलो. मी त्याला आंधळे व्हावे म्हणून प्रहार केला आहे. आणि मला त्याला आंधळे करावे लागले व त्याला फाडावे लागेल या अगोदर की मी त्याच्यातून काही बनवू शकेन. पहा, मला त्याचे सर्व धर्मशास्त्र वळवायला लागले. तुम्हाला ठाऊक आहे, तो त्यातील एका मंडळीमध्ये महान माणूस होता. त्याच्याकडे सर्व प्रकारच्या पदव्या होत्या. त्याला कशावर ही सुधारायचे नव्हते, परंतु," तो म्हणाला, "मला काय करायचे आहे की ते सर्व त्याच्यामधून बाहेर काढायचे आहे."

64 तीच ती गोष्ट होती. ते त्याच्यामध्ये अधिक टाकणे नव्हते, परंतु त्याच्यामधून बाहेर काढणे होते. मी विचार करतो आज आपल्या खूपशा प्रचारकांबरोबर तीच काय ती बाब आहे - त्यांच्यातून बाहेर काढणे, जेथे देव त्यांच्यामध्ये पवित्र आत्मा टाकू शकेल. बाहेर काढणे! तेथे तो म्हणाला तो....

आणि तो म्हणाला, "प्रभू, परंतु हा मनुष्य भयंकर माणूस आहे."

तो म्हणाला, "परंतु, पहा, तो प्रार्थना करीत आहे. आता, तू विशिष्ट मार्गावरुन खाली जाशील आणि तू झऱ्याजवळ येशील. तू झऱ्याकडून डाव्या बाजूला वळ, आणि तू खाली जा. तेथे एक सफेद घर असेल. जा दारावर ठोठाव. फक्त पहा, त्या दिवाणखान्यामध्ये झोपलेला असेल, तेथपर्यंत जेवढे ते त्याला आणू शकत होते. त्याच्यावर तुझे हात ठेव, त्याला दिमिष्काच्या नदीवर ने आणि येशूच्या नावात त्याचा बाप्तिस्मा कर, कारण, मी तुला सांगतो मी काय करणार आहे. त्याला माझ्याकरिता खूप गोष्टी सहन कराव्या लागणार आहेत, कारण तो परराष्ट्रीयांसाठी माझा दूत आहे." आमेन!

65 "बरे, आता, एक मिनिट थांब, प्रभू! आता, मी कोणती शाळा सुचवू?" मी तुम्हाला सांगतो काय करुया, गलतीकरांस वाचूया आणि शोधून काढूया. अगदी सरळ मागचा अध्याय. गलतीकरांस १ शोधूया, आणि दहाव्या पदापासून सुरुवात करुया, आणि शोधून काढूया पौल कोणत्या शाळेत गेला होता, कोणत्या विद्यालयात, आणि त्याच्यावर कोणाचे हात ठेवले गेले, आणि, ओह, ते सर्व जे घडले. गलतीकरांस, पहिला अध्याय. वेळ वाचविण्यासाठी, त्याच्या परिवर्तनाबद्दल सुरुवात करुया, दहावे पद:

मी आता मनुष्याची, की देवाची मनधरणी करावयास पाहत आहे? मी मनुष्यांना संतुष्ट करावयास पाहत आहे? काय मी अजूनपर्यंत मनुष्याने संतुष्ट करीत, मी ... राहिलो असतो तर मी ख्रिस्ताचा दास नसतो.

ओह, माझ्या, माझ्या, माझ्या! मी येथे एक लहानसे काहीतरी या अगोदर फक्त सांगतो. गलतीकरांस १, आठवा अध्याय काढा. किती जणांना ठाऊक आहे की पौल हा एक होता ज्याने त्या लोकांना येशूच्या नावात परत बाप्तिस्मा घ्यावयास लावला, प्रेषित १९? निश्चित त्याने केले. ते आपण अगदी थोडेसे येथे वर, आठव्या पदापासून घेऊया:

... जरी आम्ही, किंवा स्वर्गातून दूताने, कोणती इतर सुवार्ता तुम्हाला प्रचार केली त्यापेक्षा वेगळी जी आम्ही तुम्हाला प्रचार केली, तो श्रापित असो.

"पौला, तुला ही सुवार्ता कोठे मिळाली?" ते नववे पद:

... आम्ही अगोदर सांगितले, तसेच आम्ही परत आता सांगतो, जर कोणत्या मनुष्याने तुम्हाला कोणती निराळी सुवार्ता प्रचार केली जी तुम्ही स्वीकारली होती त्यापेक्षा, तो श्रापित असो.

जर तो एक आद्य देवदूत असेल, जर तो एक बिशप असेल, जर तो एक जनरल पर्यवेक्षक असेल, जर तो डॉक्टर अमुक आणि अमुक असेल, तो जो कोणी असेल, जर तो येशू ख्रिस्ताच्या नावात पाण्याचा बाप्तिस्मा प्रचार करीत नसेल, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा, दानांची पुनःस्थापना प्रचार करीत नसेल, ख्रिस्ताचे आगमन, या सर्व गोष्टी, तो शापित असो. जर तो यातील कोणतेही वचन घेऊन, सांगण्याचा प्रयत्न करतो की ते इतर कोणत्या दिवसासाठी होते आणि ते कोणत्यातरी नवीन विचित्र कल्पनेवर ठेवतो की आम्ही ते कोणत्या विद्यालयात शिकलो, तो शापित असो.

66 आपण पुढे वाचूया, पाहू पौलाला ते कसे मिळाले, पहा या सकाळी मी तुम्हाला काय सांगण्याचा प्रयत्न करीत आहे:

कारण मी आता मनुष्याला, अथवा देवाला संतुष्ट करावयास पाहतो? किंवा मी मनुष्यांना संतुष्ट करावयास पाहतो? कारण जर अजूनही मी

मनुष्यांना खुश करावयास पाहतो, मी ... देवाचा दास नाही.

मी कशी काय कसली अपेक्षा करु शकतो, कसा काय माणूस जो देवाला प्रेम करतो - विशेषकरुन, प्रचारक - मनुष्याकडून तिरस्कार केला जावा यापेक्षा दुसरे काही अपेक्षा करु शकतो? माणसे तुमचा तिरस्कार करतील. बरे, येशू म्हणाला, "जर ते मला, घराच्या मालकाला म्हणतात.... मी मालक आहे, तुम्हा सर्वापेक्षा थोर. मी एक आहे जो जास्त चमत्कार सादर करु शकतो आणि पवित्र आत्म्याने तुम्हा सर्वापेक्षा अधिक करु शकतो, कारण माझ्यामध्ये अखंड पूर्णत्व आहे. आणि जर त्याने मला बालजबूब संबोधले, कितीतरी अधिक ते तुम्हाला म्हणतील?" परंतु म्हणाला, "तुम्ही काय म्हणावे याचा विचार करु नका, कारण बोलणारे तुम्ही नाहीत. तो त्या वेळेस पिता बोलणारा असेल जो तुमच्यामध्ये वास करतो. अगदी सरळ वचनाबरोबर रहा." आणि त्याने, जेव्हा पुस्तक लिहिण्याचे संपविले, तो म्हणाला, "कोणी मनुष्य जो या पुस्तकातून एक शब्द काढून टाकील किंवा यामध्ये एका शब्दाची भर घालील, त्याला जीवनाच्या पुस्तकातून काढण्यात येईल, त्याच्यासाठी." देव आपल्याला सरळ त्याच्याबरोबर राहण्यास साहाय्य करो.

67 आता पुढचे पद, आता मला वाचू द्या, आता लगेचच वाचूया:

कारण बंधुनो मी तुम्हास कळवितो ... [ते तुम्हाला न्यायात नेते] मी तुम्हाला कळवितो, भावांनो, की मी सांगितलेली सुवार्ता मनुष्याच्या सांगण्याप्रमाणे नव्हे. [आता, मी मेथडिस्ट नाही, बॅप्टिस्ट, प्रेसबायटेरियन, किंवा पेन्टिकॉस्टल ही नाही. ती मनुष्याच्या सांगण्याप्रमाणे नव्हती.]

... कारण मला ती मनुष्यापासून प्राप्त झाली नाही, विद्यालयातून नाही....

"ती मनुष्यापासून प्राप्त झाली नाही, विद्यालयातून नाही, डॉक्टर नाही, दैवत्वाचा नाही, शाळेच्या अभ्यासाने नाही. मला ती कधी त्या प्रकारे प्राप्त झाली नाही, मी कधी तशा प्रकारे शिकविले नाही, मला ती कधी त्याप्रकारे मिळाली नाही, ती कधी माझ्याकडे तशा प्रकारे आली नाही." पौल, मग कशी काय ती आली?

... शिकविली ही नाही, परंतु येशू ख्रिस्ताच्या प्रकटीकरणाने ती मला प्राप्त झाली.

"जेव्हा ख्रिस्ताने स्वतःला मला प्रकट केले, की तो देवाचा पुत्र होता, जेव्हा तो अग्निस्तंभ त्या दिवशी माझ्यावर पडला, मी म्हणालो, 'तू कोण आहेस, प्रभू?' तो म्हणाला, 'मी येशू आहे.'"

68 मी तुम्हाला दाखविणार आहे त्याला काय घडले. आता, अगदी आता, जर एका माणसाला अनुभव आला, त्यांना त्याला दहा वर्ष ग्रीक शिकण्यासाठी, आणि अजून दहा वर्ष दुसरे काहीतरी करण्यासाठी, द्यायची आहेत, आणि त्या वेळेपर्यंत तो गेलेला असेल. पहा:

... कारण ती मला मनुष्यापासून प्राप्त झाली नाही, आणि ती मला कोणी शिकविली ही नाही, तर येशू ख्रिस्ताच्या प्रकटीकरणाने ती मला प्राप्त झाली.

यहुदी धर्मातल्या माझ्या पूर्वीच्या वर्तणुकी विषयी तुम्ही ऐकले आहे की....

"मी मोठा डॉक्टर होतो, मुला. माझ्याकडे ते होते." तो गमलियेलच्या खाली शिकविला गेला होता, जो त्या वेळचा भूमीतील उत्तम शिक्षक होता. किती जणांना माहित आहे की गमलियेल हा उत्तम शिक्षकांपैकी एक होता? होय, महाशय. "माझा यहुदी धर्म, मुला, मी तो घेतला होता. मला ठाऊक होते सर्व प्रेषितांचे पंथ कसे म्हणायचे आणि ह्या सर्व गोष्टी, तुम्ही पहा. मला ठाऊक होते सर्व सकाळच्या प्रार्थना कशा म्हणायच्या आणि लोकांना आशीर्वाद द्यायचा." पहा?

... कसे की मी देवाच्या मंडळीचा पराकाष्ठेचा छळ करीत असे, व तिचा नाश केला [कसे काय मी त्या पवित्र लोळणाऱ्या जमावाला थांबविण्याचा प्रयत्न केला, पहा?]:

आणि यहुदी धर्मात मी पुढे गेलो होतो....

"मी महान माणूस होता. मुला, मी खरोखर ... मी पुढे गेलो होतो, मी त्यांना दाखविले मी त्यांना खाली चिरडू शकतो, कारण मी स्तेफनाला ठार केले आणि इतर कित्येक गोष्टी मी केल्या. पहा मी कसे केले." कसा सीमेबाहेर त्याने छळ केला....

69 आणि माझ्या पूर्वजांच्या संप्रदायाविषयी मी विशेष आवेशी असल्यामुळे, माझ्या लोकांतल्या माझ्या वयाच्या पुष्कळ जणांपेक्षा यहुदी धर्मात मी पुढे गेलो होतो.

आता, लक्षात ठेवा, देवाचे वचन नाही; "पूर्वजांच्या परंपरा." मंडळीच्या परंपरा, दुसऱ्या शब्दात. "मी अगदी ... मी मुळापासून मेथडिस्ट होतो, मी मुळापासून बॅप्टिस्ट होतो, मी मुळापासून पेन्टिकॉस्टल होतो." ओह, तू होतास? मला मुळापासून देवाचे असायचे आहे. बस एवढेच, पहा. ठीक आहे.

... माझ्या पूर्वजांच्या परंपरा.

परंतु जेव्हा देवाला हे बरे वाटले [ओह - ओह, पौला, येथे तू आलास], ज्याने मला माझ्या मातेच्या उदरातून जन्मल्यापासून वेगळे केले [जिने मला अगदी या जगात आणले], आणि त्याच्या कृपेने मला बोलाविले,

आपल्या पुत्राला माझ्याठायी प्रकट करण्यासाठी....

ते कसे आहे? "माझ्यामध्ये पवित्र आत्मा. मला घेणे देवाला बरे वाटले, ज्याने मला उदरातून वेगळे केले, आणि मला पुत्र दिला, जो पवित्र आत्मा आहे, आत्म्याच्या रुपात, माझ्यामध्ये, स्वतःला माझ्यामध्ये प्रकट केले." ओह, माझ्या! हू! मी विश्वास करतो मला अगदी थोडेसे ओरडायचे आहे.

70 पहा, मला तुला सांगू दे, भावा. जेव्हा देवाला बरे वाटले! ओह, हालेलूया! जेव्हा देवाला बरे वाटले! दारुडा पिता. आई (आई, देव तुला आशीर्वादित करो, मी तुझ्या विरुद्ध काही सांगत नाही.), परंतु आईला जेवढे सशाला बर्फाच्या बुटाबद्दल माहिती असेल तेवढेच देवाबद्दल ठाऊक होते. आणि वडील जो दारु पिऊन रस्त्यावर पडत असे. आणि अगदी शाळेत जाण्यासाठी पायात बूट ही नव्हते, आणि माझ्या मानेवर लांब केस होते, आणि येथे इंडियानामध्ये सर्वजण माझा द्वेष करीत कारण मी कंटकीमधील होतो. आणि कशी, ओह, कसे ते दुर्गंधीयुक्त दृश्य होते. परंतु देवाला ते बरे वाटले! आमेन! ते देवाला बरे वाटले, ज्याने मला माझ्या मातेच्या उदरापासून वेगळे केले, की तो त्याचा पुत्र माझ्यामध्ये प्रकट करील, वचनाचा सेवक बनविण्याद्वारे जो सरळ त्याच्याबरोबर राहील, जो दृष्टांत आणि चिन्हे आणि अद्‌भुते आणि चमत्कार दाखवील. आणि, ओह, माझ्या!

71 पहा तो कशाबद्दल बोलत होता? देवाला ते करणे बरे वाटले. कसे? लक्षपूर्वक ऐका. आता सोळावे पदः

त्याच्या पुत्राला माझ्यामध्ये प्रकट करण्यासाठी, अशासाठी की मी परराष्ट्रियामध्ये त्याच्या सुवार्तेची घोषणा करावी; तेव्हा लागलीच मंडळीची मसलत न घेता....

"मी कधीही कोणत्या बिशपकडे गेलो नाही आणि त्याला विचारले नाही मी काय करायला हवे. मी कधीही कोणत्या रक्तमांसाकडे, कोणत्या संस्थांकडे किंवा कोणत्याही गोष्टीकडे गेलो नाही. मला कधीही त्यांच्याशी काहीही कर्तव्य नव्हते. मी कधीही रक्त आणि मांसाची मसलत घेतली नाही. मी यरुशलेमेत ही त्या सर्व महान पवित्र याजकांकडे व पवित्र पित्यांकडे, आणि ते सर्व, याकडे गेलो नाही, आणि म्हणालो नाही, 'आता, तुम्हाला ठाऊक आहे, मला दृष्टांत दिसला. त्याबद्दल मी काय करावयास हवे? मी आशीर्वादित प्रभू येशूला दृष्टांतात पाहिले.' "त्यांनी म्हटले असते, 'येथून चालता हो, तू ... तू पवित्र पाखंडी. बरे, तुला काय झाले?' नाही, माझ्याकडे सुरुवातीपासूनच त्यांच्या सर्व पदव्या होत्या."

72 आणि येथे पौल म्हणाला, मी तुम्हाला शास्त्रलेखात दाखवू शकतो, की तो म्हणाला जे काही तो कधी शिकला ते सर्वकाही त्याला विसरावे लागले, आणि त्याला तो तुच्छ लेखतो, की त्याने ख्रिस्ताला जाणावे. ओह!

आणि माझ्यापूर्वी झालेल्या प्रेषितांकडे यरुशलेमेस वर न जाता; मी लागलाच अरबस्थानात निघून गेलो, व तेथून दिमिष्कास पुन्हा परत आलो.

मग तीन वर्षांनंतर मी केफाला भेटावयास यरुशलेमेस वर गेलो, व त्याच्याजवळ पंधरा दिवस राहिलो.

आणि जसे आपण पुढे वाचतो, आपल्याला आढळते की तो आणि प्रेषित पेत्राने कधी जीवनात एकमेकांना पाहिले नव्हते, कधी एकमेकांची ओळख नव्हती, कधी एकमेकांना पाहिले नव्हते; परंतु जेव्हा ते एकत्र आले ते सारखीच सुवार्ता प्रचार करीत होते. देवाकडे एक शाळा आहे. होय.

73 येथे पेत्र होता, पेन्टिकॉस्टच्या दिवशी उभा राहिला, म्हणाला, "पश्चाताप करा, तुम्हातील प्रत्येकाने, तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या, तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान मिळेल."

फिलिप्प म्हणाला, "ओह, किती हे गौरवी आहे! मला देखील काहीतरी करणे आहे. खाली.... मला शमरोनातून बोलावणे आले आहे." तेथे खाली गेला आणि रस्त्यावर साक्ष देऊ लागला. पहिली गोष्ट, एक आजारी व्यक्ती आला. त्याच्यावर हात ठेवले, आणि उड्या मारु लागला आणि झेप घेऊ लागला. म्हणाला, "देवाचा गौरव असो, येथे आम्ही आहोत," मोठी सभा घेऊ लागला. तो म्हणाला, "तुम्हा सर्वांना पवित्र आत्म्याची गरज आहे." तो म्हणाला, "तुम्हाला काय केले पाहिजे, तुम्हाला येशूच्या नावात बाप्तिस्मा घेणे आहे." तेव्हा त्याने त्यांना, प्रत्येकाला, तेथे बाहेर नेले आणि त्या सर्वांना येशूच्या नावात बाप्तिस्मा दिला. म्हणाला, "पेत्रा, ये, त्यांच्यावर तुझे हात ठेव आता." आणि त्यांना पवित्र आत्मा मिळाला.

पेत्र, कर्नेल्याच्या घरी तेथे वर, त्याच प्रकारे.

74 पौलाने कधी त्याला अगदी पाहिले नव्हते किंवा अगदी त्याच्याबद्दल ऐकले नव्हते. परंतु तो इफिसच्या वरच्या किनाऱ्यावरुन गेला, आणि त्याला काही शिष्य आढळले. त्याला बॅप्टिस्ट प्रचारक आढळला, जो - अपुल्लो होता, परिवर्तन झालेला वकील, चाणाक्ष, हुशार, जुना करार घेऊन, त्याद्वारे येशू हा देवाचा पुत्र आहे हे सिद्ध करीत होता. होय, महाशय, तो हुशार मनुष्य होता. आणि ते ओरडत होते, त्यांच्याकडे आनंद होता. पवित्रशास्त्र असे म्हणते. प्रेषित कृत्ये अठरा आणि एकोणीस अध्याय वाचा आणि पहा जर ते बरोबर नाही. त्यांच्याकडे आनंद होता, ते आत्म्यामध्ये नृत्य करीत होते, आणि सभोवार धावत होते, तुम्हाला माहित आहे. पौल म्हणाला, "परंतु तुम्ही विश्वास केल्यानंतर तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला काय?"

75 आणि तुम्हाला बॅप्टिस्ट भाऊ जे लोकांच्या घशाखाली ढकलण्याचा प्रयत्न करतात आणि म्हणतात ते मूळ ग्रीक म्हणते, "तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला का जेव्हापासून ... अथवा, जेव्हा तू विश्वास केलास?" मी तुम्हाला ते ग्रीक माझ्याकडे आणण्याचे आव्हान करतो. ते मूळ ग्रीक माझ्या स्वतःच्या मालकीचे आहे. माझ्याकडे अरेमिक, आणि इब्री देखील आहे. त्यातील प्रत्येक जण म्हणते, "तेव्हापासून तुम्ही विश्वास केला

तुम्हाला पवित्र आत्मा प्राप्त झाला का?"

विश्वासाद्वारे तुम्ही तारलेले आहात. तो तुमचा देवामधील विश्वास आहे. रक्त तुम्हाला पापापासून शुद्ध राखते, कारण ते बलिदान करते. रक्त तुमचे तारण करीत नाही; रक्त तुम्हाला शुद्ध राखते. तुम्ही कसे तारलेले आहात? विश्वासाद्वारे तुम्ही तारलेले आहात, आणि ते देवाच्या पूर्वज्ञानाद्वारे, तुम्हाला पाचारले आहे. तुम्ही वाचलेले आहात, आणि रक्त प्रायश्चित करते, नियमित तुम्हाला शुद्ध राखते. आणि मग एका आत्म्याद्वारे तुमचा पवित्र आत्म्यामध्ये बाप्तिस्मा होतो, विश्वासूजनांच्या संगतीमध्ये, आणि पवित्र आत्म्याच्या संगतीमध्ये, आत्म्याने चालविले गेलेले, चिन्हे, अद्‌भुते करीत.

76 थांबा, येत आहे, कशासाठीतरी थांबलेला आहे. (फक्त थोडेसे, आपल्याला ते मिळेल. कसेहीकरुन आशा करतो आपण करु. मी तुम्हाला या समयी मला बोलविण्यास सांगितले, नाही का? फक्त याकडे पाहण्यास मी थांबलो. फक्त एक किंवा दोन शब्द अधिक, फक्त थोडेसे अधिक.)

77 हे तारण किती काळ टिकते? किती काळ? हे कोणत्या प्रकारचे तारण आहे? मंडळी ते मंडळीपर्यंत? पासून.... इब्री ९:११ मध्ये वळूया, फक्त एक मिनिट, अगदी पाहण्यासाठी की किती काळ, फक्त काही मिनिटासाठी. इब्रीच्या पुस्तकामध्ये वळूया आणि शोधूया हे तारण अगदी किती काळ टिकते, पाहू हे कोणत्या प्रकारचे तारण आहे. आता इब्री ९:११ वाचूया:

ख्रिस्त हा पुढे होणाऱ्या चांगल्या गोष्टीसंबंधी प्रमुख याजक होऊन आला, व जो हातांनी केलेला नाही, म्हणण्यासाठी [आता हा तोच शिक्षक, पौल आहे, पहा] म्हणजे या सृष्टीतला नाही, अशा अधिक श्रेष्ठ व पूर्ण मंडपातून;

आणि बकरे व वासरे ह्यांचे नव्हे, तर स्वतःचे रक्त अर्पण करुन एकदाच [किती वेळेस? एकदाच!] परम पवित्र स्थानात गेला, आणि त्याने [एका आठवड्यासाठी तारण, पुढच्या संजीवनापर्यंत तारण? कोणत्या प्रकारचे?] आपल्यासाठी अनंत मुक्ती मिळविली.

78 अनंत शब्द म्हणजे काय आहे? ख्रिस्तामध्ये, मी विश्वास केल्यानंतर.... पवित्र आत्म्या खेरीज, कोणी मनुष्य येशूला ख्रिस्त म्हणू शकत नाही. तेथे तीन दर्जाचे लोक आहेत: अविश्वासू, ढोंगी विश्वासू, आणि विश्वासू. परंतु ते ज्यांनी एकदा अनंत जीवनामध्ये विश्वास केला आहे, त्यांनी मंडपात प्रवेश केला आहे.

जुना मंडप घ्या. त्याने पहिली गोष्ट काय केली? मंडपात प्रवेश केला, ते परराष्ट्रिय. पुढचे पितळी वेदी होती, जेथे ते बलिदानाला सोन्याच्या गंगाळात धुत होते. पुढचे बलिदानाला मारणे होते, आणि वेदीवर रक्त शिंपडणे. मग वर्षातून एकदा अहरोन, कशाने अभिषेक केलेला? शारोनच्या गुलाबाच्या सुगंधी द्रव्याने, बहुमूल्य तेलाने ज्यामध्ये सुगंधी द्रव्ये असतात. त्यांनी ते त्याच्या डोक्यावर ओतले. ते त्याच्या झग्याच्या काठापर्यंत ओघळले. पहा कसे ह्या माणसाला त्या पडद्याच्या मागे वर्षातून एकदा जाणे होते, दयेच्या आसनासाठी त्याच्या समोर रक्त घेऊन. आणि एक वर्ष त्याने त्याची काठी आत घेतली आणि ती विसरला. तेव्हा ते परत त्याच्यासाठी गेले, तिला अंकुर फुटला होता आणि ती बहरली होती - एक जुनी काठी जी त्याने जंगलात कदाचित चाळीस वर्षासाठी नेली असेल, ती त्या पवित्र स्थानात ठेवली. पहा, जेव्हा त्यांनी कराराचे रक्त घेतले, रक्त, तो अभिषिक्त होता. आणि त्याने वस्त्र परिधान केली होती ज्याला लहान घुंगरु होते, एक डाळिंब व घुंगरु. आणि त्या माणसाला अशा प्रकारे चालणे होते की प्रत्येक समयी जेव्हा तो त्याच्या पायांची हालचाल करील, आणि अशा प्रकारे हलवील आणि त्याचे पाऊल उचलील, ते आवाज करीत "पवित्र, पवित्र, पवित्र परमेश्वरासाठी. पवित्र, पवित्र, पवित्र परमेश्वरासाठी. पवित्र, पवित्र, पवित्र परमेश्वरासाठी." ओह, माझ्या!

79 मी कशाबद्दल बोलत आहे? ब्रॅन्हम मंडप, हे ऐका! तुमच्याकडे संधी होती. जेव्हा एक मनुष्य एकदा पवित्र आत्म्याने अभिषेक पावतो, देवाच्या कुटुंबामध्ये दत्तक घेण्यासाठी, पित्याद्वारे योग्य जागेवर स्थानापन्न करण्यासाठी, आणि तेथे बाहेर सेवेसाठी ठेवला जातो, त्याच्या जीवनाच्या उद्देशासाठी, किंवा देवाने त्याला ज्यासाठी पाचारण केले आहे, त्याचे चालणे "पवित्र, पवित्र, पवित्र परमेश्वरासाठी! पवित्र, पवित्र, पवित्र!" असायलाच हवे.

"ओह, तुम्ही बाजूला वळावयास हवे या आणि...."

"पवित्र, पवित्र, पवित्र परमेश्वरासाठी."

"ओह, तुम्ही सर्व विश्वास करावयास हवा.... वडील हे म्हणाले."

परंतु, "परमेश्वरासाठी पवित्र, पवित्र, पवित्र." त्याचे वचन प्रथम असू दे. जे काही तेथे आहे, आणि तुमच्या हृदयात स्थिर होऊ दे! तुमचे चालणे वचनात असावयास हवे. "परमेश्वरासाठी पवित्र, पवित्र, पवित्र."

"ओह, जर तुम्ही फक्त येथे याल, मी तुम्हाला सांगेन आम्ही काय करु. आपण संस्थागत होऊ, तुला आमच्या संस्थेत टाकू. तू मोठा मनुष्य होशील."

"पवित्र, पवित्र, पवित्र परमेश्वरासाठी. पवित्र, पवित्र, पवित्र परमेश्वरासाठी," पुढे जात आहे. कोण काय म्हणते काही फरक पडत नाही!

"या बरोबर ... ह्या ध्वनिमुद्रणपट्ट्या मागे घ्या! हे करा, हे करा, ते करा, इतर करा."

"पवित्र, पवित्र, पवित्र परमेश्वरासाठी." तुमची नजर कलवरीकडे स्थिर झाली आहे, आणि तेथे काही नाही जे तुम्हाला थांबवू शकेल!

तुमच्या जीवनाचे प्रत्यक्ष ध्येय, तुम्ही राजाच्या राजमार्गाने चालत आहात, बहुमोल अभिषेकाच्या तेलाने अभिषेक केलेले, परमपवित्र स्थानात जात आहात. हू! आमेन. ठीक आहे.

80 पौल म्हणाला त्याला ते माणसाकडून मिळाले नाही. आता तो काय म्हणतो? (गलतीकरांस, आपल्या धड्याकडे परत.) "त्याने स्वतःच्या इच्छेनुरुप स्वसंकल्पाचे रहस्य आपल्याला कळविले. त्याचा संकल्प काय आहे? "स्वसंकल्पाचे रहस्य कळविले." तुम्ही जे लिहून घेत आहात, नववे पद. (आता मी लगेचच घाई करणार आहे आणि हे बाहेर काढणार आहे, कारण आपल्याला उशीर झालेला आहे.)

ओह, प्रत्येक शब्द हा इतका [अस्पष्ट शब्द]. ओह, प्रत्येक शब्द हा हिरा आहे. तुम्ही फक्त तो घेऊ शकता आणि फक्त चमकवत रहा. तुम्ही खणू शकता.... तुम्ही त्यातील एक शब्द घेऊ शकता, त्याला उत्पत्तीमध्ये न्या आणि त्याला चमकावा; त्याला निर्गमनात न्या आणि त्याला परत चमकवा; तुम्ही त्याला लेवीयमध्ये नेऊ शकता आणि परत उजळवा; आणि प्रकटीकरणामध्ये येण्याची वेळ येईल, तो प्रत्येक कणाने येशू असेल! आमेन. तुम्ही त्याला फक्त उजळवीत रहा जेवढे तुम्हाला हवे असेल तेवढे, जेव्हा तुम्ही प्रकटीकरणामध्ये याल तो येशू असेल. कारण तो म्हणाला, "मी तो आहे जो होता, जो आहे, आणि जो येणार आहे. मी दाविदाचे मूळ आणि संतान आहे, पहाटेचा तारा. मी अल्फा, ओमेगा आहे." ते ग्रीक वर्णमालेत ए ते झेड आहे. "मी ए ते झेडपर्यंत आहे. मी आहे ... मी सर्वात सर्वकाही आहे." ते बरोबर आहे. "मी तो आहे जो जिवंत होता, आणि मेला होता, आणि सर्वदा जिवंत आहे. माझ्याकडे मृत्यूच्या आणि अधोलोकाच्या किल्ल्या आहेत." ओह, माझ्या! प्रत्येक हिरा तुम्ही येथून उचला आणि त्याला उजळवायला सुरुवात करा, तो सरळ येशूमध्ये उजळेल.

81 (आता, फक्त थोडेसे पुढे आणि मग आपण थांबू.) मग, आपण कशासाठी थांबलेलो आहोत? आपण कशासाठी भेटत आहोत? ह्याचा हेतू काय आहे? जग कशासाठी कण्हत आहे? अणू बॉम्ब कशासाठी पलीकडे लटकलेले आहेत? रेणू आणि अणू, आणि...? ओह, हे सर्व कशासाठी आहे?

रोमकरांस, आठमध्ये वळा, फक्त एक मिनिट. ती कशासाठी वाट पाहत आहे? हे सर्व कशाची वाट पाहत आहे? काय समय आहे? रोमकरांस, आठवा अध्याय, आणि सुरुवात करुया आणि याबद्दल वाचूया, ओह, मी आठ म्हणालो ... एकोणीस पदापासून सुरुवात करुया, आणि अगदी सरळ येथे वाचूया, ते खरे मधुर बनविण्यासाठी. ते बरोबर आहे. मला ठाऊक आहे आपण तेथे कोठे जात आहोत. ठीक आहे. रोमकरांस, आठवा अध्याय. मी विश्वास करतो आता मी योग्य आहे. होय, महाशय. आठवा अध्याय, आणि येथे अठराव्या पदापासून सुरुवात करुया. चौदाव्या पदापासून सुरुवात करुया.

कारण जितक्यांना देवाचा आत्मा चालवीत आहे, तितके ... देवाचे पुत्र आहेत. [ते बरोबर आहे.]

कारण पुन्हा भीती बाळगावी असा दासपणाचा आत्मा तुम्हाला मिळाला नाही;...

82 "ओह, विचार करतो जर मी फक्त धरुन राहीन. ओ, जर मी आता फक्त धरुन राहीन!" काहीही धरुन राहणार नाही! ते मी धरुन राहणे नाही; ते तो धरुन राहतो किंवा नाही ते आहे. आता मी त्याच्यामध्ये आहे, पहा.

बरे, तुम्ही म्हणता, "बरे, जर मी त्याच्यामध्ये आहे..." आता तुम्ही प्रेसबायटेरियन म्हणता, "हा, आम्ही नेहमीच तो विश्वास केला आहे." परंतु तुमचे जीवन सिद्ध करते तुम्ही नाही, जोपर्यंत तुम्ही त्या प्रकारच्या जीवनात चालत नाही जसे तो चालला, तुम्ही तीच सुवार्ता विश्वास करता जिचा त्याने प्रचार केला.

तुम्ही म्हणता, "आहा," बॅप्टिस्ट म्हणतो, "निश्चित, मी अनंत सुरक्षिततेत विश्वास करतो." आणि तेथे बाहेर जातो आणि सिगारेट फुंकतो आणि नृत्य करण्यास धावतो, आणि स्त्रिया त्यांचे केस कापतात, त्यांचे चेहरे रंगवितात आणि अशा प्रकारे वर्तन करतात जसे काही मला - माहित - नाही - काय? तुमची फळे सिद्ध करतात की तुम्ही ते विश्वास करीत नाही.

जेव्हा मी म्हणतो, "तुम्ही दैवी आरोग्यावर विश्वास करता?"

"ओह, डॉ. जोन्स म्हणाला ते असे आहे, ते गतकाळात होते."

बरे, तुम्ही ढोंगी! तुमच्याबरोबर काय बाब आहे? तुम्ही दयनीय भ्रमित मुले. तुम्ही सुवार्तेपासून इतके दूर आहात येथपर्यंत की ते दयनीय आहे. तुम्ही कोणत्यातरी चिखलमय रस्त्यावर कोणत्यातरी जळणाऱ्या कचऱ्याच्या ढिगावर पथभ्रष्ट झालेले आहात. तुम्ही येथे पाहत नाही तो काय म्हणतो? तो प्रत्येक आत्मा जो कबूल करीत नाही की येशू हा देहात आलेला आहे अगदी आता तो चुकीचा आत्मा आहे. पवित्र शास्त्र म्हणते येशू ख्रिस्त हा काल, आज, आणि युगानुयुग सारखाच आहे. तो जे काही तेव्हा म्हणाला, तो ते आता आहे, तो त्या प्रकारे नेहमी असेल. फक्त ऐका:

83 कारण पुन्हा भीती बाळगावी असा दासपणाचा आत्मा तुम्हाला मिळाला नाही; तर तुम्हाला ... [श्रोते म्हणतात, "दत्तकपणाचा."] आत्मा प्राप्त झाला आहे.

आता, तुम्ही दत्तक घेतले गेल्यानंतर, ठीक आहे. तुम्ही दत्तक घेतले गेल्यानंतर, तुम्हाला स्थानापन्न केले जाते, मग तुम्ही समजता - समारंभ म्हटल्या नंतर आणि तुम्हाला शरीरात योग्य प्रकारे ठेवले गेल्यानंतर. तुम्ही पुत्र आहात, नक्की, कन्या आहात, जेव्हा तुमचा नव्याने जन्म होतो. तो तुमचा जन्म आहे. परंतु आता तुम्ही योग्य पदावर स्थानापन्न केले जाता.

आपल्याला भीती बाळगावी ... असा दासपणाचा आत्मा प्राप्त झाला नाही; परंतु आपल्याला दत्तकपणाचा आत्मा मिळाला आहे, ज्याद्वारे

आपण, अब्बा, बापा, अशी हाक मारतो. [ज्याचा अर्थ "माझ्या देवा." ठीक आहे.]

तो आत्मा स्वतः आपल्या आत्म्याबरोबर साक्ष देतो, की आपण देवाची मुले आहोत:

कसे ते तसे करते? तुम्ही म्हणता, "देवाचा गौरव असो! हालेलूया! ते मला खटकत नाही, मी देवाचे मूल आहे," आणि बाहेर जाता आणि त्या गोष्टी करता ज्या तुम्ही करता? देवाचा आत्मा देवाचे कार्य करील.

येशू म्हणाला, "जो माझ्यावर विश्वास करतो, जी कार्ये मी करतो तो देखील करील," पहा.

84 जर ही वेल उपजते आणि ती द्राक्षीचा घोस निर्माण करते आणि दुसरी उपजते आणि भोपळ्यांची रास उत्पादन करते, तेथे काहीतरी चुकीचे आहे, पहा. ती कलम केलेली मंडळी आहे, ती कलम केलेली वेल आहे, ती कलम केलेली व्यक्ती आहे. आणि जर व्यक्ती कोणत्या संप्रदायाबरोबर, संप्रदायाच्या मालकीचा असेल, स्वतःला ख्रिस्ती म्हणवीत असेल, आणि पवित्र आत्मा नसेल आणि देवाचे सामर्थ्य असेल आणि या सर्व गोष्टी....

85 आता, जर तुम्ही येथे बाहेर जाता आणि या, जे करतात त्या जमावा सारखे वर्तन करता ... फक्त कारण की तुम्ही अन्यभाषेत बोलता, मी सैतानाला अन्यभाषा बोलताना पाहिले आहे. होय, महाशय. मी त्यांना आत्म्यात नृत्य करताना पाहिले आहे, आणि ओरडताना, आणि तोंडाला फेस येताना, आणि सर्वकाही, आणि ते सर्व. मी ते पाहिले आहे. मी त्याबद्दल बोलत नाही. मी देवाच्या आत्म्याबद्दल बोलत आहे.

तो आत्मा स्वतः आपल्या आत्म्याबरोबर साक्ष देतो, की आपण ... देवाची मुले आहोत:

आणि जर मुले, ... तर वारीसही आहोत; देवाचे वारीस, ... ख्रिस्ताबरोबर सोबतीचे वारीस असे; अहो ... आपल्याला त्याच्याबरोबर जर दुःख भोगीत असलो, तरच आपल्याला ... त्याच्याबरोबर गौरव प्राप्त व्हावे.

कारण आपल्याठायी दुःखे....

फक्त हे ऐका. ओह, जर हे सुंदर नाही!

कारण आपल्याठायी जे गौरव प्रकट होणार आहे त्याच्यापुढे सांप्रत काळाची दुःखे काहीच नाहीत असे मी मानतो. [आपल्या ठायी!]

कारण सृष्टी देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याची प्रतीक्षा....

येथे बोलले जाते, येथे लहानसा शब्द आहे, लहानसा समासातील वाचन, सृष्टी हे बरोबर आहे, ग्रीकमध्ये. "...सृष्टी अपेक्षेने, सृष्टी देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याची प्रतीक्षा अत्यंत उत्कंठेने करीत आहे."

86 सर्वकाही कसली प्रतीक्षा करीत आहे? सर्व सृष्टी कसली प्रतीक्षा करीत आहे? देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याची. मंडळी तिच्या पदावर येण्याची प्रतीक्षा करीत आहे. देवाचा पुत्र कोण होता, जेव्हा आदाम...? त्याची सत्ता कुठे होती? पृथ्वीवर. त्याची सत्ता पृथ्वीवर होती. ते बरोबर आहे का? तो तेव्हा एल, एला, इलोहीम नव्हता; तो यहोवा होता, पहा. ते म्हणजे, "मी देव आहे, आणि मी माझ्या अधिपत्याखाली काही कमी दर्जाचे बनविले आहेत. आणि मी त्यांना सत्ता दिली आहे. आणि त्यांच्या सत्तेखाली, त्यांच्या सत्तेखाली, पृथ्वी आहे." मनुष्याला पृथ्वीवर सत्ता होती. आणि सर्व अखंड सृष्टी देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याची वाट पाहत आहे. ओह!

आपण त्या आनंदी सहस्राब्दी दिवसाच्या
आगमनाकडे डोळे लावून आहोत,
जेव्हा आपला धन्य परमेश्वर येईल आणि
प्रतीक्षेत असलेल्या वधूला घेऊन जाईल;
ओह, पृथ्वी कण्हत आहे, ओरडत आहे
त्या दिवसाच्या मधुर मुक्ततेसाठी,
जेव्हा आपला तारक पुन्हा परत एकदा
पृथ्वीवर येईल.

87 ते बरोबर आहे? प्रतीक्षा. देव त्याच्या मंडळीला पदावर स्थानापन्न करण्याचा प्रयत्न करीत आहे, स्वतःला प्रकट करण्यासाठी, एक मिळविण्यासाठी की त्याच्याद्वारे अशाप्रकारे कार्य करावे, म्हणेल, "तेथे माझा आत्मा मुक्तपणे वाहत आहे. तेथे ते आहे. मी येथे कार्य करु शकतो." येथे एका दुसऱ्याला घे आणि त्याला स्थानात बसव: "मी त्याला स्थानात बसवू शकतो." दत्तकपण, स्थानापन्न करणे, प्रकट होणे. त्याला येथे बाहेर घे आणि त्याच्यासाठी समारंभ कर, दुताद्वारे त्याला भेट दे, त्याला काहीतरी सांग. आता, जर त्याने सत्य सांगितले.... आता जर तो फक्त काहीतरी ढोंग करतो, ते कार्य करणार नाही. नाही, नाही, ते कार्य करणार नाही. आपल्याकडे ते भरपूर होते. परंतु मला म्हणायचे आहे देवाच्या पुत्राचे प्रकटीकरण, जेव्हा देव स्वतः प्रकट होतो आणि तो त्याला बाहेर पाठवितो. आणो मग तो पुढे जातो, आणि तो जे काही म्हणतो ते सत्य असते. तो जे काही करतो ते सत्य असते. तो काय करतो, तो ख्रिस्ताला प्रकट करतो. तुम्ही त्याची कशी पारख करता? ज्या प्रकारे तो वचनाबरोबर राहतो, अगदी सरळ वचनाबरोबर. पहा, तसेच कसे तुम्ही सर्व मनुष्यांना ओळखता, ज्या प्रकारे ते वचनाबरोबर राहतात. "जर ते वचनानुसार बोलत नाही, त्यांच्यामध्ये जीवन नाही," पवित्रशास्त्र म्हणते, पहा. त्यांना सोडून द्या.

88 आता वाचूया, मग आपल्याला थांबावे लागेल, कारण आपला समय निघून गेलेला आहे. ठीक आहे, दहाव्या पदामध्ये, किंवा नवव्या

पदामध्ये, खरंतर:

ख्रिस्ताच्या ठायी पूर्वी केलेल्या योजनेप्रमाणे, त्याने स्वतःच्या इच्छेनुरुप स्वसंकल्पाचे रहस्य आपल्याला कळविले [आपल्याला दत्तक घ्यावयाचे]....

त्याने स्वतः हा संकल्प केला, जगाच्या उत्पत्ती अगोदर. किती जणांना हे कळले?

ती योजना अशी की कालखंडाच्या....

ओह, माझ्या. आपण परत येथे येतो! ओह, ते अगदी सोडून देऊया, पहा. ...

कालखंडाच्या पूर्णतेची व्यवस्था....

89 तुम्ही कालखंडाच्या पूर्णतेमध्ये विश्वास करता? पवित्र शास्त्र असे म्हणते. "कालखंडाच्या पूर्णतेची व्यवस्था." ती कालखंडाची पूर्तता काय आहे? तेथे कालखंड होता ... बरे, मोशेच्या नियमाचा तेथे कालखंड होता. तेथे बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचा कालखंड होता. तेथे ख्रिस्ताचा कालखंड होता. तेथे संस्थागत मंडळ्यांचा कालखंड होता. तेथे पवित्र आत्म्याच्या वर्षावाचा कालखंड होता. आता ज्यासाठी जग वाट पाहत आहे, ज्यासाठी कण्हत आहे, वेदना भोगीत आहे, त्या दत्तकपणाचा कालखंड आहे. आणि जेव्हा काळाची पूर्णता येईल, जेव्हा कालखंडाच्या पूर्णतेची वेळ येईल.... तो काळाच्या पूर्णतेचा समय काय आहे? जेव्हा मेलेले उठतील, जेव्हा आजार संपेल, जेव्हा सर्व पृथ्वीचे कण्हणे थांबेल - कालखंडाच्या पूर्णतेचा समय. हे पहा:

कालखंडाच्या पूर्णतेची व्यवस्था लावताना स्वर्गात व पृथ्वीवर जे आहे ते सर्व ख्रिस्तामध्ये एकत्र करावे....

तुम्ही आनंदित नाही का? तो ते कसे करणार आहे? सर्व गोष्टी कोणामध्ये एकत्र करणार? [मंडळी म्हणते, "ख्रिस्तामध्ये."] तुम्ही ख्रिस्तामध्ये कसे येता? ["एका आत्म्याद्वारे."] एका आत्म्याद्वारे आपला सर्वांचा ["एका शरीरात"] एका शरीरात बाप्तिस्मा झाला आहे. आणि ते शरीर कोणाचे शरीर आहे? ["ख्रिस्ताचे."] अगोदरच न्यायनिवाडा केलेले. त्याने आपला न्याय घेतला. मग आपण काय आहोत? "जेव्हा मी ["रक्त"] रक्त पाहीन, मी तुम्हाला ओलांडून जाईन." आणि प्रत्येक समयी तो शरीराकडे पाहतो, तेथे ते, रक्ताळलेले, बसलेले आहे. कशाद्वारे मी तेथे आहे? पवित्र आत्म्याद्वारे. तो अगदी ओलांडून जातो. ओह, माझ्या!

आणि जेव्हा कालखंडाच्या पूर्णतेचा समय येतो की तो सर्वकाही एकत्र ... ख्रिस्तामध्ये करतो, दोन्ही जे स्वर्गात आहेत....

90 आता जर तुम्हाला नावाबद्दल बोलायचे असेल, आपण अगदी त्यावर थोड्या वेळासाठी आताच सुरु करु. स्वर्गातील सर्व कुटुंबे नाव काय आहे? [मंडळी म्हणते, "येशू ख्रिस्त."] पृथ्वीवरील सर्व कुटुंबाचे नाव काय आहे? ["येशू ख्रिस्त."]

येथे काही चांगल्या स्त्रिया आहे, चांगल्या, वास्तविक महिला. तेथे एक मिसेस ब्रॅन्हम, मिसेस विल्यम ब्रॅन्हम आहे. ती माझी पत्नी आहे. ती माझ्याबरोबर घरी जाते. पहा, बाकीच्या तुम्ही तुमच्या पतीबरोबर जाता.

तेथे जिवंत देवाची एक महान जिवंत मंडळी आहे. ती त्याचे नाव धारण करते. ती त्याच्या आत्म्याने भरलेली आहे. ते बरोबर आहे. मी नाही म्हणत....

91 मी चांगल्या कृत्यांना दोषी ठरवीत नाही, मी त्यांच्या दवाखान्यांना आणि ज्या चांगल्या गोष्टी ते करतात, त्यांना दोषी ठरवीत नाही. मी विचार करतो ते अद्भुत आहे, आणि गरीब, पीडित मानवजातीला देवाचा आशीर्वाद आहे. मी त्या सर्व इतर गोष्टी ते करीत आहेत त्यांचा धिक्कार करीत नाही. चांगले, ते अगदी ठीक आहे. आणि त्यांच्या मोठ्या संस्था, त्यांचे दशसहस्त्र डॉलर, कोपऱ्यावर दारुचे अड्डे पाहण्यापेक्षा मी निश्चित ते पाहीन, कोणत्याही वेळी. मी नक्कीच सेवक म्हणून उपदेशमंचावर उभे राहिलेले त्यांना आदर करतो.

परंतु जेव्हा कालखंडाच्या अंताला जेव्हा एकत्र करण्याची वेळ येईल, तो देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याची प्रतीक्षा करील. त्या कालखंडात, तो सर्व काही एकत्र आणील, ते सर्वकाही ख्रिस्तामध्ये आणले जाईल. ख्रिस्त काय आहे? किती जणांना ... आम्ही कसे त्यामध्ये येतो? १ करिंथ १२, "एका आत्म्याद्वारे आपणा सर्वांचा एका शरीरात बाप्तिस्मा झाला आहे," जे ख्रिस्ताचे शरीर आहे; आणि प्रत्येक चांगले दान आणि प्रत्येक चांगल्या गोष्टीचे जी त्याच्याकडे आहे, आपल्याला भागीदार बनविले आहे. ते बरोबर आहे? आणि अखंड पृथ्वी कण्हत आहे, रडत आहे, प्रकटीकरणाची वाट पाहत आहे की जेव्हा ख्रिस्त आणि त्याची मंडळी एकत्र जोडली जाईल.

तो ... कालखंडाच्या पूर्णतेचा समय ... एकत्र करावे एकामध्ये ... सर्वकाही ख्रिस्तामध्ये, दोन्ही जे स्वर्गात आहे, आणि ... पृथ्वीवर; आणि अगदी त्याच्यामध्ये:

त्याच्यामध्ये ... आपल्याला वतन मिळाले आहे....

92 ओह, भाऊ नेविल, मला हा वेळ घेण्याकरिता क्षमा करा. तो शब्द वतन. ओह, माझ्या! मला माहिती आहे तो ... ते जवळच्या आप्तासारखे आहे, भावा. मी आशा करतो मी वेडा नाही. मी अगदी ... मी नाही विचार करीत मी आहे. परंतु, ओह, माझ्या! काय? वतन. आपल्याला वतन मिळाले आहे. कोणीतरी तुमच्यासाठी काहीतरी सोडून जाणे आहे. देवाने, जगाच्या स्थापनेपूर्वी, तुमच्यासाठी काहीतरी सोडले आहे. पुस्तकात नाव लिहिलेले आहे, की जेव्हा कोकरा वधला जाईल तुम्ही त्याच्याबरोबर ओळखले जाल. ओह! ते आज रात्रीसाठी वाचवून ठेवूया. अगदी थोडेसे पुढे वाचूया. माझ्या, माझ्या! आज रात्री कसे काय आपण तिसऱ्या पदापर्यंत - किंवा तिसऱ्या अध्यायापर्यंत जाणार

आहोत? यातील अगदी आपण चार किंवा पाच पदे देखील घेतली नाही. आता आपण समाप्त करणार आहोत, जरी. मी फक्त ते वाचणार आहे आणि जाऊ देणार आहे.

93 त्याच्यामध्ये देखील आपल्याला वतन मिळाले आहे, ....

काय? येथे आपल्याला कसे हे वतन मिळाले आहे? आपल्याला ते कसे मिळाले आहे? कारण आपण सचोटीने चालतो? आपल्याला हे वतन कसे मिळते? कारण आपण पूर्वनिर्धारित आहोत. आमेन. हू! माझ्या आर्मेनियन भावांनो, मला ठाऊक आहे ते भयंकर कठीण आहे. माझा दुखविण्याचा हेतू नाही, परंतु हे समजणे मला इतके बरे वाटते की.... तुम्हाला ते कळले. तुला ते कळले, भावा, ठीक आहे. तुम्ही अगदी ते पाहू शकत नाही. तुम्हाला ते अगदी तसेच कळले, पहा. तुम्ही सर्व ठीक आहात, पहा. तुम्ही ठीक आहात, परंतु.... ओह, परंतु त्याकडे पाहणे इतके चांगले आहे. अगदी जसे भाऊ नेविल काल कमानदार रस्त्याबद्दल बोलले, "पाऊल शिडी घ्या आणि सभोवताली जा आणि पहा तुम्हाला काय मिळाले आहे." होय, महाशय. तेच काय ते ... हेच काय ते? देवाचा पवित्र आत्मा ही आपली पाऊल शिडी आहे आपल्याला सांगण्यासाठी की आपल्याकडे काय आहे, पहा.

94 पहा, वतन. ओह, माझ्या! कोणत्या प्रकारचे वतन?

...मनाच्या संकल्पाप्रमाणे जो अवघे चालवितो त्याच्या योजनेप्रमाणे पूर्वनिर्धारित असल्याने....

जेव्हा तो होता.... तो पिता असण्यापूर्वी, तो देव असण्यापूर्वी, तो तारक असण्यापूर्वी, तो आरोग्यदाता असण्यापूर्वी, या सर्वा अगोदर, त्याने पूर्वनिर्धारित केले, पुस्तकात कोकऱ्याचे नाव घातले, त्याच्या पूर्वज्ञानाद्वारे खाली पाहिले आणि तुमचे नाव पाहिले, ते देखील तेथे घातले. ते काय आहे? आणि काही काळाने आपण जगात आलो, पापी आई वडिलांपासून जन्मलेले; आपण जगभर फिरलो, तुम्हाला माहित आहे. पहिली गोष्ट तुम्हाला माहित आहे - जसा तो लहानसा आकड्याच्या नाकाचा यहुदी, पौल, तुम्हाला माहित आहे - असभ्य वर्तन करीत असलेला; आणि, पहिली गोष्ट, काहीतरी म्हणाले, "येथे, येथे, येथे, येथे, येथे!"

तुम्ही म्हणता, "ओह, अब्बा, बापा!"

येथे आपली येण्याची सुरुवात झाली, पहा. त्याच्याठायी आपल्या वतनाकरिता आपल्याला पूर्वनिर्धारित केले, जे आपल्याला पूर्वनिर्धारित केले. आपण जगाच्या पायारंभापूर्वी त्याचे वतनदार आहोत, पहा. ओह! त्याच्या स्वतःच्या हेतूखातर त्याचा स्वतःचा चांगला संकल्प पूर्ण करण्याखातर, ते अगदी तंतोतंत, देव आणि तारक असण्यासाठी.

95 तुम्ही सत्याचे वचन ऐकल्यानंतर, ज्याच्यामध्ये तुम्ही भरवसा देखील ठेवला....

आणि सत्य काय आहे? येशू सत्य आहे, सुवार्तेचे सत्य. आणि काय सुवार्ता? तेथे केवळ एक सुवार्ता आहे. गलतीकरांस १ म्हणते, "जरी दूताने इतर कोणती सुवार्ता प्रचार केली, तो शापित असो. ही सुवार्ता आहे, तुमच्या तारणाची सुवार्ता; दुसरी नाही. तेथे आकाशाखाली तुम्ही तारावे म्हणून इतर कोणते नाव देण्यात आले नाही." परंतु कोणत्या नावात? [श्रोते म्हणतात, "प्रभू येशू ख्रिस्त."] ओह, मी!

...त्यामध्ये ... तुम्ही विश्वास ठेवल्यानंतर, तुम्हाला शिक्का मारण्यात आला....

ओह, "तुम्ही विश्वास ठेवल्यानंतर!" कसे आपण त्याच्यावरुन सहज धावू शकतो, भावांनो? ते आज रात्रीसाठी अगदी ठेवूया, तुम्ही काय म्हणता? ओह, माझ्या! मी आज रात्री अगदी अजून पुढे जाऊ शकत नाही. ते आज रात्रीसाठी सोडूया. मी अगदी तो "शिक्का मारण्यात आला" हा शब्द सोडू शकत नाही, तुम्ही तेथे कसे जाता, पहा.

96 पूर्वनिर्धारितपणाद्वारे वतन. मी काहीतरी वारशाने मिळविले आहे. काय वतन? तेथे कोणीतरी असावे लागते जे मला वतन सोडून जाईल. का, तुम्ही म्हणता, "येशू मला वतन सोडून गेला." मी तुमची क्षमा मागतो, येशूने माझ्यासाठी कधीही वतन सोडले नाही, येशूने तुमच्यासाठी कधीही वतन सोडले नाही. तो केवळ खाली आला आणि तुमच्या वतनासाठी किंमत मोजली, तुमच्या वतनात तुम्हाला आणले. परंतु तुमचे नाव कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात पृथ्वीच्या स्थापनेअगोदरच टाकलेले होते. देवाने तुम्हाला तुमचे वतन दिले. तुमचे वतन प्रथम होते. येशू केवळ आला.... येथे या प्रकारे ते करण्याचा प्रयत्न करतात: देव म्हणतो, "बरे, तेथे कित्येक लोक नाश पावतात, आणि मला... त्यांना वाचवायचे नाही, तेव्हा मी येशूला खाली पाठवीन आणि कदाचित तो ... कोणालातरी वाईट वाटेल, आणि कळेल मी काय केले आहे आणि वाचेल." ओह, दया! मी अशा प्रकारे माझे कार्यालय चालवीत नाही - अगदी जरी काही वेळेस ते इतके दुर्बलरित्या मी चालवितो, जेन. मी ते अशाप्रकारे करणार नाही. देवाबद्दल काय?

97 देवाने, त्याच्या पूर्वज्ञानाद्वारे, तंतोतंत पाहिले कोण वाचेल आणि कोण वाचणार नाही. त्याने येशूला त्यांना वाचविण्यासाठी पाठविले ज्यांना त्याने अगोदरच निवडिले होते. पौल नाही का म्हणाला, याच्या पाच पदे अगोदर, की त्याने आपल्याला अगदी जग असण्यापूर्वीच त्याच्याठायी निवडिले आहे? ते आपले वतन आहे. देवाने आपल्याला निवडले, आणि येशूला येऊन, किंमत देऊ दिली. कशी? त्याचे रक्त सांडून, की आपल्याकडे कोणतेच पाप गणले जाणार नाही. तुम्ही काहीही करीत नाही. बरे, जर तुम्ही.....

"ज्याला एकदा सत्याचे ज्ञान प्राप्त झाले आहे, त्याने जर हेतुपुरस्सर पाप केले, तेथे आणखीन बलिदान नाही."

आता, तेथेच जेथे तुम्ही परत उठता, म्हणता, "त्याबद्दल काय, भाऊ ब्रॅन्हम?"

परंतु फक्त लक्षात ठेवा, पहा, "...ज्यांनी सत्याचे ज्ञान प्राप्त केले आहे." त्यांनी सत्य स्वीकारले नाही; त्यांनी केवळ त्याचे ज्ञान स्वीकारले आहे, पहा. त्यांच्यासाठी अशक्य आहे ज्यांना एकदा प्रकाश मिळाला आणि पवित्र आत्म्याचे वाटेकरी झाले, चांगल्या वचनाच्या सामर्थ्याची रुची घेतली.... त्या सीमारेषेवरील विश्वासूसारखे तेथे पाठी. कित्येकांनी यावर मला पत्रे लिहिली आहेत.

98 तेथे ते सीमारेषेवरील विश्वासणारे तेथपर्यंत चालले, यहोशवा आणि कालेब सरळ तेथे पलीकडे गेले. का? आता आपण त्याला पवित्र आत्मा म्हणणार आहोत, त्या तेथील भूमीला. येथे ते मागे आले, किंवा येथे वर, म्हणा हा पवित्र आत्मा आहे आणि येथे ते परत मागे आले, तुम्ही पहा. तेथेच जेथे अभिवचन आहे, तेथे ते आहे. बरे, ते म्हणाले, "दहा हेरांना पाठवा, प्रत्येक वंशातील एक जण, जेणेकरुन आपल्या सर्व वंशांना कळेल की आपले वतन काय आहे, कोठे तेथे पलीकडे आपल्याला स्थानापन्न केले जाईल, आपण कोठे ठेवले जाऊ. तेव्हा मी काही हेर पाठविणार आहे."

ते सर्व तेथे पलीकडे गेले आणि म्हणाले, "ओह, माझ्या! आपणा सर्वांना पवित्र लोळणारे म्हटले जाईल! ओह, ओह! अहा, आपण ते करु शकत नाही," पहा.

यहोशवा आणि कालेब म्हणाले, "ते कसे दिसते ते मी पाहीन." तेव्हा ते पलीकडे आले आणि सर्वत्र पाहिले. माझ्या, ते वर येथे पोहोचले आणि द्राक्षाचा मोठा घड कापून घेतला आणि खाली परत आले. म्हणाले, "मुलांनो, ती भूमी उत्तम आहे, अगदी उत्तम! येथे हे आहे, यातील काहींची चव घ्या."

येथे आहे ते जे काही म्हणाले, "ओह, ते चांगले आहे, परंतु, ओह, त्या मोठ्या.... कडे पहा. ओह, आपण ते करु शकत नाही. त्या सर्व मोठ्या संप्रदायांच्या विरुद्ध, त्या सर्व मोठ्या गोष्टी विरुद्ध उभे राहायचे? ओह, ते फार वाईट आहे, आपण ते करु शकत नाही. नाही, महाशय! ते करण्याचा कोणता मार्ग नाही. नाही, महाशय." आणि ते म्हणू लागले, "ओह, मिसराच्या मांसाच्या भांड्याभोवती परत जाऊया. बरे झाले असते जर आपण तेथे खालीच राहिलो असतो. आपण हे करु शकत नाही. हा रस्ता खूपच अडचणीचा आहे. ओह, आपण हे करु शकत नाही, आपण ते करु शकत नाही."

99 वृद्ध कालेब म्हणाला, "स्तब्ध रहा, तुम्ही सर्वजण!"

यहोशवा म्हणाला, "तुमच्यातील प्रत्येकजण चूप रहा! मला काहीतरी सांगू द्या."

"ओह, अरेरे, अरेरे, अरेरे, आपण हे करु शकत नाही! ओह, आम्ही नाही. बरे, जर मला माझी पत्याची टोळी सोडावी लागेल, भाऊ ब्रॅन्हम.... जर मला कोणत्या वृद्ध स्त्रीप्रमाणे माझे केस वाढू द्यावे लागतील, मला अगदी ठाऊक नाही मी काय करीन. जर मला माझ्या लहान तोकड्या विजारी काढून टाकाव्या लागतील, जर मला हे सोडावे लागेल ... तुम्हाला माहित आहे. आणि जर मला सिगारेट सोडावे लागेल, जर मला ते करावे लागेल!" तुम्ही दयनीय सहेतुक उदाहरण. होय. "अगदी करु शकत नाही."

यहोशवा म्हणाला, "ओह, ती चांगली आहे. हालेलूया! ती आपण घेऊ शकतो." ते काय होते? ते मोठ्या शहरांकडे पाहत होते जी तटबंदी होती. आणि यहोशवा आणि कालेब देवाने दिलेल्या अभिवचनाकडे पाहत होते. काही फरक पडत नाही तुम्ही कोण आहात, वचनाबरोबर रहा. वचनाबरोबर रहा!

100 पेत्र म्हणाला, "तुमच्यातील प्रत्येकाने, पश्चाताप करा, आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये बाप्तिस्मा घ्या, कारण हे अभिवचन तुम्हाला [कोणती वचनदत्त भूमी?], तुमच्या मुलाबाळांना व जे दूर आहेत त्या सर्वांना, म्हणजे जितक्यांना परमेश्वर आपला देव स्वतःकडे बोलाविल, तितक्यांना दिले आहे."

याने दुखावले जाऊ नका (समाप्त करीत आहे), कृपया दुखावले जाऊ नका, पहा. तेथे तुम्ही पिलग्रिम होलीनेस आणि नाजरीन आहात, तुम्ही सरळ पवित्रीकरणामध्ये आलात, सरळ येथपर्यंत चाललात या स्थानापर्यंत आलात जेथे अगदी तुम्ही द्राक्षे पाहू शकलात, आणि मग वळलात आणि मागे परतलात. पहा काय घडले? तीच काय ती बाब आहे. तुम्ही कधीच पलीकडील भूमीमध्ये चालला नाहीत. मला आज भूमीमध्ये, एक नाजरीन किंवा पिलग्रिम होलीनेस, किंवा त्यांच्यातील एक दाखवा, ज्याच्याकडे मोठी आरोग्य शिबिरे आणि चिन्हे आणि अद्भुते केली जातात. मला एक दाखवा. तुम्ही मिसराबरोबर स्थायिक झाला आहात, लसणाच्या भांड्याकडे परत गेला आहात. तुम्ही कादेश बर्ण्याकडे थांबलात. ते बरोबर आहे.

101 पहा, मला तुम्हाला इब्रीमध्ये एक ठिकाण देऊ द्या, सहावा अध्याय. "कारण ज्यांना एकदा प्रकाश मिळाला [तुम्हाला चांगले ठाऊक आहे. जर तुम्हाला नाही, आता तुम्हाला ठाऊक आहे, पहा.], आणि ज्यांनी स्वर्गीय दानाची रुची घेतली, जे पवित्र आत्म्याचे वाटेकरी झाले...."

रुची घेतली, पहा. लोक मंडळीत जातात, आणि सभोवती बसतात व म्हणतात, "तुम्हाला ठाऊक आहे, ते खरे असू शकतात. ते खरे असू शकते. असू शकते, अगदी सारखेच, परंतु मुला, मी तुला सांगतो, ते करण्यासाठी पुष्कळ विश्वासाची गरज लागते."

"स्वर्गीय दानाची रुची घेतली, आणि ज्याद्वारे तुम्ही पवित्र झाला होता ... ते कराराचे रक्त अशुद्ध गोष्ट गणले."

प्रचारका सारखे. त्याच्या आईने त्याला दूर पाठविले. तो म्हणाला, "परमेश्वराचा दास होण्यासाठी मला पाचारण झाले आहे."

"ठीक आहे. पहिली गोष्ट मला करणे आहे ती म्हणजे परिटाकडे कपडे धुणे आहे, प्रिय. मी कोणत्यातरी शाळेत तुला पाठवीत आहे." सर्वात वाईट गोष्ट जी कधी तिने केली. ते बरोबर आहे. ते त्याच्यामधून सर्वकाही बाहेर काढतील जे देव त्याच्यामध्ये टाकण्याचा प्रयत्न करीत

आहे.

102 मग.... आता पहा.

"कारण जर आपण हेतूपुरस्सर पाप केले, हेतुपुरस्सर पाप केले आपण सत्याचे ज्ञान प्राप्त केल्यानंतर...." ज्ञान - ते शास्त्रलेखात पहा आणि समजा की पवित्रशास्त्र म्हणते तो काल, आज, आणि युगानुयुग सारखाच आहे - पहा ते सत्याचे ज्ञान आहे. ते पाहून, आपण निघून जातो, आणि कराराच्या रक्ताला गणतो....

एक माणूस म्हणाला, "ओह, होय, मी देवामध्ये विश्वास करतो." ठीक आहे, तू पहिले पाऊल उचलीत आहेस.

"निश्चित, मी पवित्रीकरणात विश्वास करतो." ठीक आहे, तू सीमारेषेवर आहेस, सरळ वर येथे पवित्र आत्मा प्राप्त करण्यासाठी तयार आहेस. परंतु तू वर पाहतोस आणि म्हणतो, "त्याबद्दल मला काही ठाऊक नाही. जर मला त्याप्रमाणे वर्तन करावे लागेल.... मला ठाऊक नाही. तुम्हाला माहित आहे त्या लोकांना ते काय म्हणतात? हू-हू, मला ठाऊक नाही ते मी करु शकेन किंवा नाही. नाही, मी विश्वास करतो मी फक्त तेथे जाईन आणि संबंध जोडीन," पहा.

आणि तुम्हाला ठाऊक आहे काय घडते? तो म्हणाला त्यांना कधी आतमध्ये येणे अशक्य आहे. त्यांनी त्यांच्या कृपेचा दिवस पापात घालविला आहे. पवित्र शास्त्र असे म्हणते. मला ठाऊक आहे ते खडतर आहे, परंतु पवित्र शास्त्र म्हणते, "स्वर्गीय दानाची रुची घेतली, आणि कराराचे रक्त गणले ज्याद्वारे...."

103 ते म्हणतात, "मी पवित्रीकरणामध्ये विश्वास करतो, एक चांगले, स्वच्छ, पवित्र जीवन."

निश्चित, परंतु जेव्हा तुम्ही पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा पाहिला, आणि बाप्तिस्मा आणि या सर्व गोष्टी पवित्र शास्त्रात, आणि तुम्ही काय केले? तुम्ही कराराचे रक्त ज्याद्वारे तुम्ही पवित्र झाला होता ती अपवित्र गोष्ट गणली. माणसा, जगामध्ये कशाने तुला येथे वर आणले? तुला खालच्या दर्जाचा पापी होण्यापासून कशाने राखले? कशाने तुझ्या जीवनातील पाप काढून टाकले, आणि मद्यपान आणि धूम्रपान, आणि स्त्रिया आणि तुमच्या जीवनातील त्या गोष्टी ज्या तेथे असावयास नको होत्या? ते कशाने केले? कराराच्या रक्ताने! मग तुम्ही पुरेसे नजीक आलात की त्या दुसऱ्या भूमीतील द्राक्षे चाखावी, आणि सुवार्तेची लाज वाटली? तुमच्या संप्रदायाला घाबरलात? देव दया करो! होय, महाशय. "कराराच्या रक्ताला अपवित्र गोष्ट गणली, आणि कृपेच्या कार्याला तुच्छ लेखले. त्याच्यासाठी कधी त्या भूमीत प्रवेश करणे अशक्य आहे."

104 काय घडले? मी तुम्हाला विचारतो. आता, मी प्रतिकात मांडणारा आहे, आणि कोणीही मनुष्य ज्याला पवित्र शास्त्र ठाऊक आहे तो प्रतिकात मांडणारा आहे. त्यातील कोणत्याही एकाने कधी वचनदत्त भूमीला स्पर्श केला? त्यातील एकाने ही नाही. तो कोणी केला, कोण तेथे पलीकडे गेले? जे प्रथम तेथे गेले होते, परत आले आणि म्हणाले, "आपण ती घेऊ शकतो."

"आपल्याला पवित्र आत्मा मिळू शकतो कारण देव तसे म्हणाला आहे! पेत्र पेन्टिकॉस्टच्या दिवशी म्हणाला, जर मी पश्चाताप केला आणि येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घेतला, मला पवित्र आत्मा मिळायलाच हवा, कारण अभिवचन मला आहे. मी ते करण्यास इच्छुक आहे. माझे, अभिवचन माझे आहे." तुम्हाला ते कळले? "आता अभिवचन माझे आहे. मी ते स्वीकारतो. ते माझे आहे!" निश्चित ते आहे. ते केवळ एक होते.

"ओह," तुम्ही म्हणता, "परंतु, भाऊ ब्रॅन्हम, पुनरुत्थानात..." ते तेथे नसणार. "ओह, ते नसणार?" नाही, महाशय. येशू म्हणाला....

105 ते म्हणाले, "आणि तू स्वतःला मोशेसारखा महान बनवितोस, आणि तू म्हणालास तू ... तू अब्राहामाला पाहिले." आणि म्हणाले, "आणि अब्राहामाला मरुन ... का, तू पन्नास वर्षे वयाचा ही नाहीस, आणि तू म्हणतोस तू अब्राहामाला पाहिले?"

तो म्हणाला, "अब्राहामा अगोदर, मी आहे." ओह, माझ्या! मी आहे, सर्वव्यापी, अनंत देव. काल नाही, उद्या नाही; मी आहे, पहा. सर्वव्यापी देव, इलोहीम, मी आहे. मग त्यांनी उचलले ... तेव्हा ते त्याला ठार करणार होते.

ते म्हणाले, "बरे, आमच्या पूर्वजांनी चाळीस वर्षे अरण्यात मान्ना खाल्ला. देवाने स्वर्गातून भाकरीचा वर्षाव केला आणि त्यांना खाऊ घातले. ते मंडळीत गेले आणि चाळीस वर्षासाठी ते चांगले मंडळीचे सदस्य होते. ["माझी वृद्ध आई सरळ या मंडळीत मेली," आणि सर्वकाही अशा प्रकारे.] आमच्या पूर्वजांनी चाळीस वर्षे अरण्यात मान्ना खाल्ला."

आणि येशू म्हणाला, "आणि ते प्रत्येकजण मेले. [मेले म्हणजे "अनंत विभक्त झाले." ते प्रत्येकजण मेले. परंतु मी तुम्हाला म्हणतो, की मी स्वर्गातून उतरलेली देवाकडून आलेली जीवनाची भाकर आहे. मनुष्य या आत्म्याच्या भाकरीतून खातो, त्याला अनंत जीवन आहे आणि तो नाश होऊ शकत नाही. आणि मी त्याला शेवटच्या दिवशी उठवीन." ओह, भावा, तो अद्‌भुत नाही का?

तो अद्‌भुत, अद्‌भुत, अद्‌भुत नाही का?
येशू आपला प्रभू अद्‌भुत नाही का?
डोळ्यांनी पाहिले, कानांनी ऐकले, जे काही
देवाच्या वचनात नमूद केले गेले;
आपला येशू प्रभू अद्‌भुत नाही का?

106 ते बरोबर आहे? आपण त्याच्या पारख करणाऱ्या आत्म्याला आपल्यामधून जाताना पाहतो. आपण त्याला चमत्कार आणि चिन्हे आणि

अद्भुते सादर करताना पाहतो. आपण ते सरळ येथे वचनात लिहिलेले ऐकतो, आणि ते सरळ तेथे बाहेर कायम केलेले पाहतो. ओह, माझ्या!

डोळ्यांनी पाहिले आहे, कानांनी ऐकले आहे, जे काही
देवाच्या वचनात नमूद केले आहे;
माझा प्रभू येशू अद्भुत नाही का?

107 पुढच्या दोन, किंवा तीन मिनिटात, येथे पाण्याच्या बाप्तिस्म्याची सेवा दिली जाईल. आणि जे बाप्तिस्मा घेणार आहेत, स्त्रियांनी येथे जावे, आणि पुरुषांनी या बाजूला जावे. आणि आता पुरुष माझ्या डाव्या बाजूला, या बाजूला येथे. आणि स्त्रिया येथे. तेथे बहिणी कपडे घेऊन तयार असतील. आणि जर कोणी पुरुष किंवा कोणी स्त्री येथे या सकाळी ज्यांची खात्री पटली असेल की तुम्ही देवाच्या वचनामध्ये विश्वास करता, आणि तुम्ही विश्वास करता की देव त्याचे अभिवचन राखतो, की जर मनुष्य पूर्णपणे त्याच्या सर्व पापांचा पश्चाताप करील...

आता, रक्ताने अजूनपर्यंत एकही गोष्ट केली नाही. नाही, तो केवळ तुमचा देवामधील विश्वास आहे. आणि देव बोलवीत आहे, फक्त "शुश्श, शुश्श, शुश्श," तुम्हाला बोलावीत आहे. तेच काय ते आता करीत आहे. "शुश्श, शुश्श." "मी कधीही बाप्तिस्मा घेतला नाही." "शुश्श, शुश्श." "बरे, जर मी अगदी सुरु केले आणि काहीतरी वेगळे केले." "शुश्श." तीच गोष्ट आहे - सुरु करणे. मग तुम्ही वेगळे करता तुम्ही तुमची सुरुवात केल्यानंतर, पहा. तुम्हाला सभोवती वळणे आहे, सुरु करणे आहे, पहा.

तुम्ही म्हणता, "बरे, मी कधीही अगदी अशा प्रकारे ते पाहिले नाही."

108 बरे, प्रिय भावा, हवे आहे की तू मला एक शास्त्रलेख दाखववा जेथे कोणत्या माणसाने ... एकतीस वर्षाच्या सेवेत जगभर मी हा प्रस्ताव ठेवला आहे, बिशप आणि इत्यादी समोर, जेथे एका व्यक्तीने, एका व्यक्तीने, कधी येशू ख्रिस्ताच्या नावाऐवजी इतर दुसऱ्या कोणत्या मार्गाने बाप्तिस्मा घेतलेला आहे. आणि प्रत्येकजण ज्यांनी येशूच्या नावात बाप्तिस्मा घेतला नव्हता त्यांना येऊन, परत त्या नावात बाप्तिस्मा घ्यावा लागला.

देवाला केवळ एक नाव होते, आणि त्याचे नाव येशू आहे. तो त्याचा पुत्र होता. त्याने त्याच्या पुत्राचे नाव घेतले. देव ... आता, येशू, शरीर मनुष्य होता. आपल्याला ते ठाऊक आहे. तो देवाचा पुत्र होता ज्याच्यावर छाया केली गेली. आता आपण एकत्व प्रकारामध्ये विश्वास करीत नाही, लोक जे म्हणतात देव तुमच्या बोटासारखा आहे. आपण विश्वास करतो तेथे देवाचे तीन गुण आहेत. देवाचे तीन गुण, ज्यामध्ये देव प्रकट झाला. परंतु तेथे एक देव आहे, पहा. ते बरोबर आहे. आपण विश्वास करीत नाही.... आपण विश्वास करतो.... मला ते अशा प्रकारे बनवू द्या, आपण विश्वास करतो की देव तीन कार्यालयात जगला. एकदा त्याचे पृथ्वीवर कार्यालय होते.

109 (आता, तुम्ही स्त्रिया या बाजूला जा, आणि तुम्ही पुरुष या बाजूला जा, जे तयार झालेले आहेत. आणि ते आता बाप्तिस्म्याच्या सेवेसाठी तयार होत आहेत.)

110 आणि, आता, देवाची तीन कार्यालये होती. त्यातील एकाला पितृत्व, किंवा पित्याचा कालखंड म्हटले गेले; दुसऱ्याला पुत्रत्व म्हटले गेले; आणि दुसरे एकाला पवित्र आत्मा म्हटले गेले. आता, आज, कोणत्या कालखंडात पिता आज कार्य करीत आहे? [मंडळी म्हणते "पवित्र आत्मा."] पवित्र आत्मा. गतकाळात तो काय होता? ["येशू."] येशू. त्या दिवसांच्या अगोदर तो काय होता? ["पिता."] परंतु तो केवळ एक देव होता. ते बरोबर आहे? तो पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा आहे. ती तीन, एका देवाची तीन कार्यालये आहेत. एक देव.

परंतु आता, पिता हे नाव नाही. ते बरोबर आहे? मला तुम्हाला विचारायचे आहे. आता मला तुम्हाला मत्तय २८:१९ द्यायचे आहे, जेथे येशू म्हणाला, "तेव्हा तुम्ही जाऊन, सर्व राष्ट्रातील लोकांस शिकवा, त्यास पित्याच्या, पुत्राच्या, व पवित्र आत्म्याच्या नावाने, [नावाने] [n-a-m-e] बाप्तिस्मा द्या...."

111 आता मला पाहायचे आहे तुम्हाला किती चांगल्या प्रकारे तुमचा शास्त्रलेख ठाऊक आहे. जेव्हा मी रेषेतून बाहेर पडेन मला सांगा. आणि तो त्यांना म्हणाला, "सर्व जगात जाऊन, संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा. जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल. जो विश्वास धरीत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल. विश्वास धरणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील. ते माझ्या नावाने भुते काढतील [ते सर्व सत्य आहे?], नव्या नव्या भाषा बोलतील, सर्प उचलतील." आता मी तुम्हाला उदाहरण म्हणून, मत्तयचा उल्लेख करणार आहे....

आता ऐका. मी कोणत्याही इतिहासकाराला विचारतो. आता हे ध्वनिमुद्रणपट्टीवर आहे, तेव्हा हे सर्व जगभर जाते. मी कोणत्याही इतिहासकाराला माझ्याकडे येण्यास सांगतो आणि माझ्याकडे कोणताही शास्त्रलेखाचा मजकूर आण, कोणताही मजकूर ... शास्त्रलेख नाही, कोणत्याही शास्त्रलेखाचा मजकूर किंवा कोणता इतिहास, इतिहासाचे कोणते पद ज्याने कधी दाखविले आहे की कोणता प्रोटेस्टंट, की कोणीही, कधी पिता, पुत्र, पवित्र आत्म्याच्या नावात बाप्तिस्मा झालेला आहे जोपर्यंत कॅथोलिक मंडळीने ते नायसिया परिषदेत नेमले नाही. आता ते ध्वनिमुद्रणपट्टीवर आहे जे जगभर जाते. सदतीस विभिन्न भाषेत त्याचे भाषांतर होते. मी समुद्रापलीकडील तुमचे येण्याजाण्याचे पैसे देईन. ते बरोबर आहे.

"पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा" ही खोटी, बनावट, कॅथोलिक मतप्रणाली आहे, आणि ख्रिस्ती बाप्तिस्मा नाही. बरोबर. लूथरने ती कॅथोलिक मंडळीतून आणली, कॅटकिझमबरोबर. वेस्लीने ती दत्तक घेतली आणि ती आली. परंतु हा देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याचा दिवस आहे, जेव्हा रहस्ये जी जगाच्या पायारंभापासून गुप्त होती ती माहिती करुन देण्यात आली. ही घडी आहे. निश्चित.

112 लक्षात ठेवा, तेथे पवित्र शास्त्रात कोणी व्यक्ती कधी पिता, पुत्र, पवित्र आत्म्याच्या नावात बाप्तिस्मा झालेली नाही. शेवटच्या प्रेषिताच्या

मृत्यूनंतर तीनशे वर्षापर्यंत, तेथे कोणी एक ही पिता, पुत्र, पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा घेतलेला नव्हता. मी "प्री - नायसिन फादर्स," आणि "द नायसिन काउन्सिल" दोन्ही वाचली आहेत. आणि तेथून त्यांनी संस्था स्थापन केली ज्याला ते ख्रिश्चन युनिव्हर्सल चर्च म्हणतात, आणि त्यातून संस्था बनविली आणि सर्व लोकांवर त्याची सक्ती केली, जी कॅथोलिक मंडळी आहे. प्रत्यक्ष शब्द कॅथोलिक म्हणजे "सार्वत्रिक," एक सार्वत्रिक ख्रिस्ती मंडळी, जगभर, एक मंडळी तिच्या ख्रिस्तीपणात जगाला आच्छादण्यासाठी.

ते लोकांना त्यामध्ये सक्ती करतात. त्यामध्ये त्यांनी दत्तक घेतले ... त्यांनी रोमन देवतेला काढून तेथे मरीयेला ठेवले आहे. त्यांनी पौलाला काढून ... ज्युपिटरला काढून, पौलाला ठेवले. अजूनही ते पागान आहेत. ते बरोबर आहे. कॅथोलिक मंडळी तेथून बाहेर आली, आणि पाचशे वर्षानंतर....

113 लुईसवीलेमध्ये त्यांचे तेथे नाटक चालू आहे आता 'बेन हर' हे. अलीकडेच तेथे टेन कमांडमेंट होते. मी इच्छा करतो ते कधीतरी त्यातील एक ... जर ते करु शकले, पंधराशे वर्षाचे अंधकार युग दाखवितील. मी इच्छा करतो ते ते दाखवितील. पंधराशे वर्षाचा पागान छळ, जेव्हा त्यांनी सर्वांना सक्ती केली आणि त्यांना ठार केले, त्यांचा खून केला, त्यांना फाशी दिली. एका हातावर एक आणि दुसऱ्या हातावर एक बैल ठेवला, त्यांना एकतर वधस्तंभाला चुंबन घ्यायला लावले किंवा या प्रकारे किंवा त्या प्रकारे केले. स्विझर्लंडमध्ये प्रत्यक्ष, खांबाच्या मागे जेथे ते उभे राहिले आणि त्यांच्या जिभा कापल्या आणि त्यांना चेटकिणी आणि सर्वकाही म्हटले, तेथे मी माझा हात ठेवला होता. ते अगदी बरोबर आहे. बरोबर!

114 आणि तोच आत्मा आज अस्तित्वात आहे. तो फक्त नियम आहे ज्याने त्याला खाली धरुन ठेवले आहे. तोपर्यंत थांबा जोपर्यंत त्याला स्वातंत्र मिळत नाही. पवित्र शास्त्र असे म्हणते. अगदी तोपर्यंत थांबा जोपर्यंत तो त्याचा रंग दाखवीत नाही, त्याला संधी मिळेपर्यंत. तुम्ही कदाचित लवकरच त्याला मत द्याल, तेवढेच जेवढे मला ठाऊक आहे, पहा. ते येईल, ते येईल. त्याला बाहेर ठेवण्याचा कोणता मार्ग नाही. त्याला येणेच आहे. ते बरोबर आहे. त्याला येणेच आहे. तो येत आहे. तेव्हा जेव्हा तो येईल, तुम्ही फक्त पहा. परंतु, भावा, तुला फक्त ही एक गोष्ट माहिती हवी: मला ठाऊक आहे मी कोणावर विश्वास केला आहे. आमेन. पुढे सरळ कूच करीत आहे, पहा. बस एवढेच.

115 तेथे समय होता जेव्हा लेखक ... जेव्हा लमसा पवित्र शास्त्राच्या लेखकाला मी सांगितले, जेव्हा त्याने पाहिले आणि देवाचे ते प्राचीन चिन्ह बघितले, अगदी तंतोतंत, ते तंतोतंत, तीन लहान टिंब त्यामध्ये, मी म्हणालो, "ते काय आहेत?"

तो म्हणाला, "तो देव तीन गुणांत आहे."

मी म्हणालो, "जसा पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा?"

त्याने माझ्याकडे पाहिले. तो म्हणाला, "तू त्यावर विश्वास करतो?"

आणि मी म्हणालो, "होय, महाशय."

तो म्हणाला, "मी ती पारख त्या रात्री पाहिली. मी विचार केला तू परमेश्वराचा संदेष्टा होतास." म्हणाला, "देव तुझे हृदय आशीर्वादित करो." त्याचे बाहू माझ्या सभोवार टाकले, म्हणाला, "आता मला माहित आहे तू आहेस." तो म्हणाला, "या अमेरिकन लोकांना अगदी ते माहित देखील नाही...." म्हणाला, "त्यांना अगदी काहीही माहित नाही." म्हणाला, "पूर्वेकडील पुस्तक घेऊन, ते त्यातून पश्चिमेतील पुस्तक बनविण्याचा प्रयत्न करतात. त्यांना अगदी त्यांचे पवित्र शास्त्र ही ठाऊक नाही." तो म्हणाला, "तेथे आकाशाखाली दुसरे नाव दिलेले नाही, दुसरे नाव नाही; कारण सर्वजणांचा कधी बाप्तिस्मा झाला ... तो येशू ख्रिस्ताच्या नावात झाला. तेथे एका देवामध्ये तीन व्यक्ती अशी कोणती गोष्टच नाही." आणि तो भाऊ लमसा, डॉ. लमसा आहे, लमसा पवित्र शास्त्राचा भाषांतर करणारा, जो ऐसेन्होवेर आणि त्या सर्व जगातील महान मुत्सद्यांच्या घनिष्ट मित्र आहे, आणि इतर सर्वकाही. त्याने त्याचे बाहू माझ्याभोवती टाकले, म्हणाला, "कधीतरी याकरिता ते तुला गोळी झाडतील. परंतु," म्हणाला, "लक्षात ठेव, ते सर्व लोक हेतुखातर मेले."

116 जेव्हा वृद्ध पेत्र तुरुंगात बसला होता त्यासारखे मला असायचे आहे. तेथे एक लहान मुलगा होता आणि तो चिंताक्रांत होता. आणि तो म्हणाला, "ओह, काय बाब आहे?"

म्हणाला, "तुला ठाऊक आहे तुला मारणार आहेत?"

पेत्र म्हणाला, "होय."

तो म्हणाला, "बरे, आज तू मरणार आहेस."

तो म्हणाला, "होय."

तो म्हणाला, "बरे, तू भीत नाहीस?

"तो म्हणाला, "नाही."

तो म्हणाला, "तू त्यांच्यातील एक असायला हवास ज्यांना ख्रिस्ती म्हणतात."

तो म्हणाला, "होय."

म्हणाला, "काय घडले?"

आणि त्याने त्याला सांगितले. तो खाली बसला आणि त्याला गोष्ट सांगितली. आणि जशी ती पुढे गेली, खाली आली, तो म्हणाला, "आणि मी या सकाळी मुक्त झालो असतो. मी जाऊन, त्यांच्या कोणत्यातरी संप्रदायामध्ये सामील झालो असतो आणि अगदी जगलो असतो, पहा. मी मुक्त झालो असतो. परंतु मी शहराच्या फाटकाकडे जाऊ लागलो, आणि मी एकाला येताना पाहिले, आत येत होता. मला ठाऊक होते तो कोण होता. मी म्हणालो, 'प्रभू, तू कुठे जात आहेस?' तो म्हणाला, 'मी परत वधस्तंभावर खिळण्यासाठी जात आहे.'" म्हणाला, "मी सरळ मागे परत आलो."

अगदी तेव्हाच ते म्हणाले, "कोणाचे नाव शिमोन पेत्र आहे?"

म्हणाला, "मी येथे आहे." [ध्वनिमुद्रणपट्टी येथे संपते.]

Sermons By
विल्यम मॅरियन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे प्रचार केले गेलेले उपदेश
"...वाणी होईल त्या दिवसात..." प्रकटी. १०:७

www.messagehub.info